# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० ५ माहे डिसेंबर सन १८७५ इ० अंक ४३

## वऱ्हाडसमाचाराचाकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| „ अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती.

### मल्हाररावाचें नाटक.

या नावाचीं मनोरंजक पुस्तकें वऱ्हाड समाचार छापखान्यांत विक्रीस आलीं आहेत. किंमत दर प्रतीस एक रुपया दोन आणे. बाहेर गावीं मागविणारास टपाल हशीलाबद्दल दोन आणे शिवाय लागती.

### प्रेमबंधन,

या नावाची सुरस व मनोरंजक उत्तम कादंबरी नुकतीच छापून तयार झालेली वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीकरितां आली आहे. किंमत दीड रुपया. बाहेर गावचे घेणारास डाक हशील तीन आणे शिवाय पडेल.

**यवतमाळ येथें यात्रेच्या वेळीं घोड्याच्या वगैरे शर्यती होणार त्यांत बक्षिसें मिळतील तीं.**

घोड्यांच्या शर्यती.

| | पहिलें बक्षीस | दुसरें ब० | तिसरें. |
|---|---|---|---|
| मोठे घोडे | ६० | २० | ० |
| मादवान | ६० | २० | ० |
| ध्यानरास घोडे | ३० | १६ | ० |
| मादवान | ३० | १६ | ० |
| तट्टें | १० | ८ | ६ |

बैलाचे गाड्यांच्या शर्यती.

| | पहिलें बक्षीस, | दुसरें बक्षीस |
|---|---|---|
| कदम | ३० | १६ |
| दौड | २० | १० |

याशिवाय उंट, बैल वगैरे जनावरांच्या शर्यती व धावणें, उड्या मारून जाणें वगैरे कित्येक प्रकारच्या खेळास ३० बक्षिसें मिळणार आहेत. हे खेळ तारीख २०।२१।२२ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी रोजीं होतील. कळावें तारीख १ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

## पत्राच्या शिलकी बाकयांवर व्याज द्यावें लागेल.

आमच्या कित्येक वर्गणीदारांकडे दोन दोन व तीन तीन वर्षांच्या बाकया येणें राहिल्या आहेत त्या त्यांनीं आतां खानगी रीतीनें लवकर पाठविल्यास आह्मांवर त्यांची मोठी मेहेरबानी होईल व त्यांची आणि आमची दगदग चुकेल. आणि अशी त्यांनीं कृपा न केल्यास निरुपाय.मुळें त्या बाकया कायदेशीर रीतीनें वसूल करणें आह्मास भाग होईल; आणि तसेंच करावें लागेल तेव्हां प्रत्येक सालची बाकी घेण्यास योग्य झाल्या दिवसापासून तिचें व्याज दरमहा दर शेकडा दोन रुपये प्रमाणें जें आकारेल तें तिजवर चढवून वसूल करण्याची तजवीज केली जाईल हें सर्वांस अगाऊ कळविण्यांत येत आहे.

तसेंच साल दरसाल बाकया मागण्याकारितां इकडून वेळोवेळां पत्रें लिहिलीं आहेत व पुढें लिहिलीं जातील त्यांचा टपालखर्च व मुद्दाम मनुष्य पाठवावे लागल्यास त्यांचा खर्चही त्या त्या कुळांवर आकारला जाईल हेंही सर्वांस कळावें. तारीख ७ माहे नोवेंबर सन १८७५ इ०

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरखबर.

### कर्जाऊ रकम मिळण्याची सोय.

अकोल्यास आम्ही देण्याघेण्याचाअल्प स्वल्प व्यापार आरंभिला आहे. त्याविषयीं मागें वऱ्हाडसमाचारांतून कळविलेंच आहे. हल्लीं लोकांच्या सोयीकरितां त्यांत आणखी थोडा फेरबदल करितों तो-असा:—

१ गहाण जिनसांवर दरमहा दर शेकडा एक रुपया व दीड रुपया असे दोन दर व्याजाचे ठेविले होते ते रहित करून हल्लीं दोन्ही प्रकारच्या गहाणास व्याजाचा दर एकच रुपया ठेविला आहे.

२ गहाणाशिवाय रोख्यावरून कर्जाऊ रकम नेणारास दरमहा दर शेकडा २ दोन रुपये व्याजाचा दर ठेविला होता तो हल्लीं १०८ दीडरुपया केला आहे.

३ इतर ठिकाणां सावकार लोक रकम देतांना मनुती अगर दस्तुरी ह्मणून शेकडा आठ च्यार, किंवा कोठें दहाही रुपये कापून घेत असतात तशी वहिवाट आह्माकडे नाहीं व यापुढेंही तसा एक पैसाही घेतला जाणार नाहीं.

४ हप्तेबंदीनें रोख्याची फेड होणें असेल तर व्याज कट मितीचें आकारलें जाईल.

सर्वांस कळावें तारीख १९ सप्तेंबर सन १८७५ इसवी.

नारायण मोरेश्वर
पत्ता— वऱ्हाडसमाचार छापखाना.

## नोटिसा.

बेशमी महमद हयाद वल्लद सेकघासी व सेक महेबू व सेक महेताब वल्लद महमद हयाद राज वस्ती अकोलें यांस नोटिस देणार बनसीलाल मुकुंदलाल साहू दुकान अकोलें यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी नोटिस दिली ती तारीख २१ नोवेंबर रोजीं पावली परंतु नोटिशींत लिहिल्याप्रमाणें एकही मजकूर बरोबर नाहीं. तुह्मी आह्मास करारनामा तारीख १० माहे फेब्रुवारी सन १८७५ इसवी रोजीं लिहून दिला तेव्हां तुह्मी ह्मणाले कीं, इमारत तीन महिन्यांत तयार करून देऊं त्याप्रमाणें तह्मी केलें नाहीं. नंतर पावसाळा आला, सरकार कमिटीमार्फतीनें आह्मास एक दोन नोटिसा इमारत तयार करण्याविषयीं आल्या, नंतर सक्त नोटिस तारीख ६ माहे आगष्ट सन १८७५ इसवीची अशी आली कीं, हवेली दुरुस्त करावी. न केल्यास लोकलफंड इंजिनियर याजकडून सदहू इमारत तयार करून तिला जो पैसा लागेल तो विळ करून घेतला जाईल. याप्रमाणें नोटिस आल्यावर आम्ही तुह्मास सांगितलें कीं, आम्ही सरकारचे बदनाम होत आहों, तुह्मी कितो दिवस काम घेऊन शुरू करीत नाहीं आणि इमारतही खराब होऊन राहिली आहे. तेव्हां तुह्मी ह्मणाले कीं, तुह्मी कामिटींत अर्ज करून तीन किंवा सहा महिन्याची परवानगी घ्यावी त्याप्रमाणें आह्मी सरकार कमिटींत अर्ज केला. सरकारानें हुकूम दिला कीं, आतां आह्मी मुदत देत नाहीं, नीट केल्यास उत्तम आहे नाहीं तर सरकार मार्फतीनें इमारत पाडून दुरुस्त करूं व पैसा तुह्मापासून घेऊं असें सांगितलें. तेव्हां आह्मी कमिटींत तुमचा करारनामाही नेऊन दाखविला त्यांनीं ह्मटलें कीं, ते जर काम करीत नाहींत तर तुह्मी दुसरे मजूर लोक लावून इमारत दुरुस्त करावी. इमारत तयार झाल्यावर करारनाम्याप्रमाणें त्यांचा पैसा वजा करून बाकीं तुमचे जे पैसे ज्यास्त पडतील ते त्यांजकडून इमारत तयार झाल्यावर फिर्याद करून घ्यावे. याप्रमाणें तुह्मास वर्तमान समजल्यावर तुह्मी पांच सात मजूर लावून किंचित् इमारत पाडिली नंतर आपले घरीं बसले व आह्मांस असें ह्मणाले कीं, आपण रांज व मजूर लावावे व त्यांच्या बरोबर आह्मीही काम करूं. एकंदर पसा आमचे नावें लिहावे व आह्मासही रोज देत जावें. नंतर सदरील इमारत तयार झाल्यावर तुमचा जो पसा ज्यास्त पडेल तो आह्मी सर्व इमारत तयार झाल्यावर चुकून देऊं असें असतांना तुह्मी पांच सात दिवस कामास आले. नंतर आले नाहीं त्यास आह्मास तर इमारत करणें भाग आहे. तेव्हां तुमच्या करारनाम्यांत इमारतीचें बोलणें आहे त्याजला जो पैसा लागून राहिला आहे तो तुमचे नावें लिहिला जातो. एकंदर इमारतीस तुमचे करारनाम्याप्रमाणें तुह्मी जें काम करावयाचें त्यास आतां अजमासें रुपये १००० लागतील असें वाटतें. व तुमचा ठराव तर रुपये १७५ एकशें पंचाहातरचा आहे. त्यास आज आम्ही कांहीं सांगू शकत नाहीं. इमारत तयार झाल्यावर जो पैसा तुह्माकडे ज्यास्त पडेल तो रीतीप्रमाणें तजवीज करून घेतला जाईल. तुह्मी लिहिता कीं, आमचा करारनामा काढून द्यावा त्यास इमारत तयार झाल्यावर जो पैसा तुह्माकडेस हजार रुपये किंवा शंभर पन्नास कमी ज्यास्त निघेल तो तुह्मी चुकवून दिल्यावर करारनामा निघेल. तुह्मी आपलें नुकसान होतें ह्मणून घरीं बसले तर अशानें कार्यभाग होणार नाहीं. जो पैसा निघेल तो तुह्मास देणें भाग आहे. आम्ही मजूर लोकांस व राज लोकांस व गवंडी तेलंगी लोकांस पैसा चुकवून देतों तो तुह्मी आपले हातानें चुकवीत जावा; अथवा आम्ही कोणाही सावकाराचें दुकान दाखवून देतों. तुह्मी कामाची देखरेख ठेवून मजुर लोकांची मजुरी तुह्मी आपल्या हातानें चुकवावीत नाहीं. ह्मणून मजूर लोकांस पैसा आह्मी देतों तो तुमचे नावें लिहितों तुह्मी ह्मणाल कीं तुह्मी आह्मास सुचविलें नाहीं सबब नोटिशीनें कळविलें आहे. तुह्मी नोटिशीनें कळविलें आहे कीं आडव्हांस देणें कबूल केलें होतें तें दिलें नाहीं सबब काम सुरू केलें नाहीं. त्यांस तुमचे करारनाम्यांत आडव्हांसचें बोलणें मुळींच नाहीं. जसजसें काम तयार होईल तसतसा पैसा घेऊं असें तुह्मी लिहिलें आहे. आतां एकंदर तुमच्या करारनाम्याप्रमाणें इमारत तयार झाल्यास तुमचा पैसा ठरावाप्रमाणें तजवीज करून घेतला जाईल व नोटिशीचाही खर्च तुमचे नावें लिहिला आहे कळावें तारीख २४ माहे नोवेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) बनसीलाल मुकुंदलाल
दस्तुर खुद

### नोटिस

मारुती वल्लद देवजी भाकरे रहाणार सिंदखेड तालुके अकोले यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार असून जन्मांध अहां मी अल्पवयी असतां माझे लग्न ४ वर्षांचे वयांत तुह्माबरोबर माझे बापानें लावून दिलें. हल्लीं माझे वय १७।१८ वर्षांचे असून १० वर्षें मी आपले बापाचे घरींच आहे परंतु मला कधींही तुह्मी नेलें नाहीं यांत १० वर्षांचे अन्नवस्त्राचे खर्चाबद्दल माझे बापास काय ते चौघ नुपर्ते देऊन मला घेऊन जावें. तुह्मी ह्मणता कीं, तू भीक मागून माझे पोट [illegible] परंतु तें काम माझ्यानें होत नाहीं [illegible]ल वर्तण [illegible] त्याविषयीं [illegible] बवर न [illegible]

नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत वर लिहिल्याप्रमाणें तजवीज न केल्यास अगर मला फारकत न दिल्यास मी दुसरा पाटाचा नवरा करीन मग तुमचा मजवर कोणतेही प्रकारें लग्नाचा हक्क रहाणार नाहीं कळावें तारीख २८ माहे नोवेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) अज्यान मर्द मारुती भाकरे बस्ती मौजे आटली तालुके खामगाव इचे हातची बांगडी.

---

नोटिस.

चिमणाजी वल्लद तुळसीराम गुरव जटाळ वस्ती भेंडी तालुके अकोलें यास भागाई मर्द चिमणाजी हल्लीं बस्ती खामगाव इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुझ्याशीं माझें लग्न झाल्यास सुमार १२ वर्षे झालीं इतक्या मुदतींत तूं एकदाही मला आपले घरीं नेऊन वागाविलें नाहींस. मी लग्न झालें तेव्हांपासून भावाचे घरीं आहे त्याला मजकारितां दरसाल सुमार ५० रुपये प्रमाणें ६०० रुपये खर्च आला आहे तो तूं पाठवून द्यावा. व तूं दुसरी गंधर्वाची बायको केली आहेस तेव्हां तुला माझी गरज राहिली नाहीं याजकारितां मला लग्नाची फारकत द्यावी ह्मणजे मी दुसरा घरठाव करून आपला संसार करीन. तुझे भरवशावर मी आजपर्यंत विनाकारण राहिले. गेले चैत्र महिन्यांत तूं स्टांपकागदावर एक करारनामा जातीच्या पंचाला लिहून दिला आहेस कीं एक महिन्यानें मी बायको घेऊन जाईन. न घेऊन जाईन तर माझा बायकोवर कांहीं वारसा राहिला नाहीं. ती मुदत चुकल्यावरही मुद्दाम माणूस पाठवून तुला कित्येक वेळां कळविलें असतां तूं निरोप पाठविला कीं मला बायको लागत नाहीं तिनें काय पाहिजे तें करावें. त्यावरूनही आतां अखेरची नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत पोटगीच्या खर्चाचे रुपये ६०० व लग्नाची फारखत पाठवून द्यावी किंवा काय जवाब असेल तो द्यावा. याप्रमाणें तुजकडून न झाल्यास माझ्या नोटिशीला तूं कबूल आहेस असें समजून गंधर्व करीन व खर्चाचे रुपयाकारितां तुजवर दिवाणींत दावा करीन. मग त्याचा खर्च व या नोटिशीचा खर्च तुला द्यावा लागेल कळावें तारीख ३ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) भागा मर्द चिमणाजी गुरव जटाल इचे हातची बांगडी.

---

नोटिस.

गोपाळ बाबणाजी आप्तीकर रहाणार अकोलें यांस चंद्रभान वल्लद सुरेभान देशमुख तरफ हिसपुर हा अज्ञान पाळण करणार तुरेराव वल्लद शामराव देशमुख देशपांडे [illegible] मूर्तिजापुर याजकडून नोटिस देण्या[illegible] रेतल्या हो[illegible]र्णी तुह्मास चंद्रभान याजकडून अको[illegible]र असेल [illegible]चेरींत त्याचे तर्फे काम करण्यास मुखत्यारपत्र देऊन वकील नेमिलें असोन तुमची गैरवर्तणूक पुष्कळ प्रकारची आह्मास दिसून आली ती अशी कीं, सन १२८१ फसलीपासून सन १२८४ फसलीपर्यंत वेतो सरकारांतून रुसूम घेतला व शिवाय दुसरे उत्पन्नाचा पैसा वगैरे घेतला असोन त्याचा हिशेब आजपावेतों आमचेकडे पाठविला नसोन तुह्मी समक्ष येऊनही दिला नाहीं हे तुमचे तावेदारीच्या धंद्यास आह्मी दूषण समजतो शेवटलेखी नोटिसीनें तुह्मास कळविणें प्राप्त होऊन कळविण्यांत येते कीं सन १२८२ फसलीपासून सन १२८४ ह्मणजे आज तारखे पावेतों आमचे वतीचा रुसूम वगैरे जो पैसा तुह्मी घेतला असेल त्याचा हिशेब ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत समजून द्यावा तसें तुह्मी न केल्यास या नोटिशीच्या खर्चासुध्दां तुमचेवर दिवाणींत फिर्याद करून रुपये घेतले जातील शिवाय तुमचे पाशीं आमचे जें मुखत्यारपत्र आहे तें आज तारखेपासून रद्द केलें आहे. आमचे वतीनें तुह्मी कोणतेंही काम करूं नये व सही करूं नये तुह्मी सही वगैरे केल्यास आह्मांस मंजूर नाहीं तुह्मास आमचे तर्फे कामावरून महकूब केलें आहे कळावें तारीख ३ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) चंद्रभान वल्लद सुरेभान अज्ञान पाळण करणार तुरेराव वल्लद शामराव देशमुख देशपांडे वस्ती मूर्तिजापूर दस्तुर खुद्द.

---

## जाहिरखबर

मी मंजी मर्द जानजी पेठे रहाणार शिगाव तालुके खामगाव या नोटिशीवरून असें जाहीर करते कीं, माझा नवरा नामे जानजी हा ७ । ८ वर्षे झालीं नाहींसा झाला आहे त्याचा पत्ता नाहीं. भुतानें नेला असें ह्मणतात त्याच्या पोटचा मला एक मुलगा झाला होता त्याच्या आशेवर मी इतके दिवस होते तो मरण पावला व त्या दिवसापासून माझा चुलतसासरा नामे रामजी वल्लद लक्ष्मण पेठे यानेंही मला घरांतून काढून दिलें. त्यामुळें मला अन्नाखास कोठें थारा नाहीं असें झालें आहे. मी याजकारितां माझा नवरा कोठें असेल व तो सुस्थितींत असेल तर त्यानें येऊन माझा संसार करावा. दुसरे कोणास माझे नवऱ्याची खबर असेल तर त्यांनीं कृपा करून मला कळवावी. व त्याची माझी गाठ घालावी. असें न होईल तर नाइलाजानें आणखी एक महिना वाट पाहून दुसरा घरठाव करीन.

या जाहिरखबरीनें रामजी माझा सासरा यांसही मी कळवितें कीं, तुला माझे नवऱ्याचा शोध असेल तर आठ दिवसांत कळवावा. पुढें तुझें ह्मणणें कांहीं एक ऐकलें जाणार नाहीं. कळावें. तारीख १ डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) अजी मर्द जानजी पेठे रहाणार खामगाव इचे हातची निशाणी बांगडी.

---



# वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुध्द ७ शके १७९७.



## प्रिन्स आफ वेल्स

मुंबईहून प्रिन्स आफ वेल्स लंकेकडे जावयास निघाले ते वाटेंत गोव्यास बेपुरास व कोलेबोस उतरले होते. गोव्याचे पोर्टुगीज गवरनरानीं त्यांचा आदरसत्कार चांगला केला. हल्लां ते लंकेस जाऊन पोंचले आहेत. तिकडे ८० हत्ती जमविले आहेत त्यांची मिरवणूक झाली. आतां ११ वे तारखेच्या सुमारास ते जलमार्गानें मद्रासेस जातील व १८वे तारखेस तेथून कलकत्याकडे जावयास निघतील.

प्रिन्स यानीं दक्षिणेंतील दुसरे प्रतीचे सरदार लोकांस आपलें स्मरण रहाण्याकरितां एकेक चांदीचें पदक दिलें,

मुंबईचे व पुण्याचे लोकांस प्रिन्स यांनीं कळविलें आहे कीं आपण आह्माकारितां जी उत्तम तजवीज व श्रम केले त्याकरितां आह्मी आभारी आहो. तसेंच गरीब लोकांस व धर्मकृत्यास देण्याकरितां त्यांनीं मुंबईस १०००० रुपये, व पुण्यास १५०० रुपये पाठविले.

पार्शी लोकांच्या स्त्रियांनीं प्रिन्स यांस मानपत्र दिलें होतें त्याबद्दल त्यांकडून पार्शी स्त्रियांस आभार आले आहेत.

---

## मि० सांडर्स साहेब रेसिडेंट यांचा राजिनामा.

आमचे वऱ्हाड प्रांतचे मुख्याधिकारी व हैदराबादचे रेसिडेंट मि० सी. बी सांडर्स साहेब सी. बी. हे नोकरी सोडून विलायतेस जाणार अशी तारायंत्रांतून बातमी आलेली प्रसिद्ध झाली. मि० सांडर्स साहेब पोक्त, व दयाळु गृहस्थ आहेत, त्यांनीं आपल्या कारकीर्दींत कित्येक लोकांचा इनसाफ करितांना दयाळुपणा लोकांच्या दृष्टीस पाडलेला आहे. रा. रा. रामसेवक दीनदयाळ यांस झालेली शिक्षा त्यांनीं रद्द केली. रा. रा. आत्माराम भिकाजी यांजवर आलेला प्रसंग त्यांनीं टाळला, रा. रा. परशराम सखाराम यांचा उजळ माथा त्यांनीं केला, मि० म्याकिंटाश साहेब यांचे शाळाखात्यांत पुन्हा पाय त्यांनीं लाविले, जमीदार लोकांच्या हक्काची मोकळीक त्यांनीं केली, मुनसफीच्या नेमणुका त्यांनीं केल्या, व दुसरींही कित्येक मोठमोठालीं दयाभूत कामें त्यांच्या हातून घडलेलीं आहेत सबब असे सद्गृहस्थ आमच्या देशाधिकारावरून जातात याबद्दल आह्मास वाईट वाटतें.

रेसिडेंट मि० सांडर्स साहेब सिव्हिल सर्व्हिस आहेत. यांची सुरू नोकरी सन १८४३ सालापासून आहे त्या मानानें पाहिलें ह्मणजे आज ३२ वर्षे हे सरकारी काम करीत आहेत. हैदराबादेस येण्यापूर्वी हे हैसुरास जुडिशियल कमिशनर होते व तेथून सन १८६८ चे मे महिन्यांत हे हैदराबादेस आले. ह्मणजे सुमार ७॥ वर्षे हे रेसिडेंट होते. यांस खासगी अलौन्ससुध्दां महिना सुमार साडेपांच हजार रुपये पगार मिळत होता असें ऐकतों. हे काल शनिवारीं रेसिडेंटीचा राजिनामा देऊन एकंदर सरकार चाकरी सोडणार होते, त्याप्रमाणें बहुधा झालें असेलच. त्यांची पत्नी कित्येक दिवस आजारी आहे ती बरी होऊन ते उभयतां पेनशनाचा उपभोग घेण्याकरितां स्वदेशीं सुखानें जावोत.

मि० सांडर्स साहेबांचे कारकीर्दींत कामें थंडाईनें होत असत ह्मणजे इकडून जाणारे प्रकर्णांचा वक्तशीर निकाल होत नसे असा बोभाट बराच आहे व तो कित्येकअंशीं खरा आहे. नाझर प्रकर्ण आज कित्येक महिने घुमत आहे, मुनसफीच्या नव्या जागा करण्याच्या बाबदींत बरेच दिवस वाटाघाट चालली आहे, अकोल्याच्या क्लार्क आफ धि कोर्टची जागा कित्येक महिने रिकामी आहेच. या व अशा कित्येक कामाचे अजून निकाल नाहींत. अशा गोष्टी पाहिल्या ह्मणजे त्यांनर थंडाईचा दोष येतो.

निजाम सरकारांनीं प्रिन्स आफ वेल्स यांच्या भेटीस मुंबईस अगर कलकत्यास जावेंच अशा अर्थाचे जरबेचे पत्रव्यवहार त्यांनीं निजाम सरकारच्या दिवाणाशीं करून त्यांस खट्टू केलें तसें करावयाचें नव्हतें याबद्दलही त्यांना बहुत लोक दोष देतात. पण ती गोष्ट त्यांचे स्वतांचे मुखत्यारीची होती किंवा हिंदुस्थान सरकारचे अनुमताची होती याविषयीं कांहीं समजलें नाहीं. तथापि या पोलिटिकल व नाजूक गोष्टी आहेत सबब त्यांचा विच्यार वऱ्हाडचे वर्तमानपत्रानें करणें व गुण दोष सांगणें हें ही नाजूक काम आहे. अस्तु.

आतां आमचे रेसिडेंटचे जाग्यावर सर रिचर्ड मीड साहेब जे नुकतेच बडोद्यास स्पेशियल कमिशनर व गवरनर जनरलचे एजंट होते त्यांची नेमणूक झालेली आहे. त्यांचें नाव बडोदा प्रकर्णानें सर्वत्र मशहूर झालेलें आहे व ते मोठे हुशार असून राजकारस्थानी पुरुष आहेत अशी त्यांची आख्या आहे. त्याप्रमाणें ते निजाम सरकारास व आमच्या वऱ्हाड प्रांतास सोयीकर व सुखदायक होवोत अशी आमची इच्छा आहे.

---

## डा० उइलसन साहेब यांचा मृत्यू.

आह्मास लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं या देशीं सर्वत्र प्रसिद्ध असलेले डा. उइलसन साहेब अलीकडे दोन तीन माहिने आजारी होते त्याच आजारांत गेल्या बुधवारीं सायंकाळीं त्यांचा शेवट झाला.

उइलसन साहेब सन १८०४ च्या डिसेंबर महिन्यांत जन्मले व या सालांत डिसेंबर महिन्यांतच पहिले तारखेस मरण पावले. यांचे वय ७१ वर्षांचें होतें. हे आपले वयाचे २४ वे वर्षी हिंदुस्थानांत आले व आज ४७ वर्षे आपल्या हिंदुस्थान देशांत धर्माचे, शोधाचे, व लोकांकल्याणाचे कामांत अकृत्रिम झटत होते, यावरून हे केवळ हिंदुस्थानाकरितांच जन्मले होते असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं यांच्या कारकीर्दीची सविस्तर माहिती लिहिण्यास आमचें लहानसें पत्र केवळ असमर्थ आहे, तथापि पुढील अंकांत संक्षेपतः आह्मी त्यांचें वर्णन करूं.

त्यांच्या कारकीर्दीचीं ४० वर्षे हिंदुस्थानांत पुरीं झालीं तेव्हां मुंबईच्या लोकांनीं त्याकरितां एक सभा करून त्यांस एक चांदीचें तबक बक्षीस दिलें होतें व त्यावर त्यांच्या आवडीच्या संस्कृत भाषेंत लेख लिहिला होता तो असाः—

इदं पात्र ख्रिस्तमीमांसाचार्याय रायलसोसैटीतिनाम्नो महासमाजस्य सदस्यायपूज्याय जोहन विलसूनये मुम्बापुरीमागतस्य तस्य चत्वारिंश्यांसांवत्सरिक्यां तिथावेकत्र मिलितै मुंम्बापुरवासिभिस्त-महानुभावत्वजनिततन्निष्ठपूज्यत्वबुद्धिभिर्भरतखण्डीयसकलजनकल्याणसंपादने विद्यावृद्धौचतत्कृतपरिश्रमणोपकृतंमन्यैरुपहारीकृतम् १९ इयां तिथौ फेब्रुवारी मासस्य १८६९.

याचा अर्थ —मुंबईस फेब्रुवारी महिन्याचे पंधरावे तारखेस रेवेरेंड जान उइलसन डी. डी. एफ. आर. एस. मुंबईस आल्यास ४० वें वर्ष लागलें, त्या दिवसाच्या उत्साहाकरितां व त्यांची स्वतांची उत्तम वागणूक व हिंदुस्थानांत विद्येच्या वगैरे कामीं जे त्यांनीं श्रम घेतले आहेत ते स्मरण्याकरितां सभा भरली तींत त्यांच्या प्रशंसेचें चिन्ह ह्मणून हें तबक त्यांस बक्षिस दिलें आहे.

यावरून त्यांच्या ठायीं लोकांचें अगत्य किती होतें हें सहज दिसून येतें. गेल्या महिन्यांत लार्ड नार्थब्रूक हिंदुस्थानचे व्हाइसराय मुंबईस गेले होते तेव्हां उइलसन साहेब आजारी आहेत असें ऐकून त्यांचे समाचारास गेले होते व प्रिन्स आफ वेल्सही यांचे दुखण्याची वार्ता ऐकून श्रमी झाले व त्यांनीं सर बार्टल फ्रियर साहेब यांस आपल्या तर्फे त्यांचे समाचारास पाठविलें होतें. डा० उइलसन साहेब मोठे विद्वान, उत्तम बुद्धिमान, पराकाष्ठेचे शोधक, व अति मेहनती होते, साऱ्या हिंदुस्थानांत व इराण, आरबस्थान, आफ्रिका वगैरे ठिकाणींही फिरून त्यांनीं मोठ मोठ्या महत्वाच्या गोष्टींचें ज्ञान संपादन केलें व याचा लोकांसही फायदा करून दिला. त्यांनीं कित्येक ग्रंथ लिहिले आहेत. हिंदूचे वेद. शास्त्रें. पुराणें, मुसलमानांचें कुराण, व पारशी लोकांचेही धर्म ग्रंथ त्यांनीं अवलोकन करून यांचे प्रमेय जाणिले होते. थोड्या वर्षांमागें उइलसन साहेब अकोल्यास आले होते तेव्हां त्यांनीं एक व्याख्यान दिलें त्यांत ऋग्वेद संहितेंतील कांहीं ऋचा प्रमाणास घेतल्या होत्या याची येथील मंडळीस आठवण असेल.

याचें पहिलें कुटुंब निवर्तल्यावर दुसरें ही एक यांनीं केलें होतें पण तेंही आधींच निवर्तलें. व कांहीं मुलें निवर्तलीं. हल्लीं त्यांचा एक मुलगा चांगला वयस्क असून विद्वान् आहे.

## वऱ्हाड.

रेसिडेंट मि. सांडर्स साहेब ३२ वर्षे नोकरी झाल्यामुळें काल रोजीं राजीनामा देऊन रिकामे होणार होते. व त्यांचे जागेवर सर रिचर्ड मीड साहेब यांची नेमणूक होऊन ते कालच कामाचा च्यार्ज घेणार होते.

असें वर्तमान आहे कीं मि० अबदुल हक्क साहेब कारंजाचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर तीन महिन्यांचे रजेवर जाणार व तोंपर्यंत त्यांचे जागेवर यवतमाळ हून रा. रा. आत्माराम भिकाजी येणार व यवतमाळास येथे नवीन आलेले मि. हेर साहेब असिस्टंट कमिशनर हे जाणार.

रा. रा. माधवराव हरि उमरावतीचे क्लार्क आफ धि कोर्ट यांनीं निम्मा पगारावर ६ महिन्यांची रजा मागितली होती परंतु नुकतीच ३ महिन्यांची हक्काची रजा त्यांनीं घेतलेली असल्यामुळें ही आणखी या प्रकारची रजा मिळणार नाहीं असा त्यांस हुकूम मिळाला असें समजतें. हें एक प्रकारें बरेंच झालें असें वाटतें. कारण रजा घेण्याविषयीं त्यांत मोठासा उत्साह नव्हता असें ह्मणतात.

खामगावची रेलवे बंद झाली होती ती १० वे तारखेपासून पुन्हा सुरू होणार.

पातुर शेखबाबू एथील चीफकानस्टेबल मि. खाजे आफीजुद्दीन यांची बदली यवतमाळ जिल्ह्यांत झाली असें समजतें. पगाराची बढती वगैरे कांहीं नसतां या बिचाऱ्यास फारच लांब लोटलें याबद्दल आह्मांस वाईट वाटतें.

मि० इलियट साहेब इजुकेशनल इनस्पेक्टर यांचा राजिनामा मंजूर झाला व ते बुधवारीं सायंकाळीं बडोद्यास आपल्या नव्या जागेवर जाण्याकरितां येथून गेले. स्टेशनावर त्यांस पोंचविण्याकारतां पुष्कळ मंडळी गेली होती. व त्याशिवाय पूर्व दिवशीं ह्मणजे मंगळवारीं सायंकाळीं कित्येक त्यांच्या अगत्यांतील मंडळींनीं खासगी रीतीनें त्यांस पुलाजवळील शाळेंत विड्यास बोलाविलें होतें व त्यांत मंडळी थोडीच होती तथापि सभेचा थाट फारच चांगला झाला. तेथें कित्येक उत्कृष्ट भाषणें इंग्लिश, मराठी, व हिंदुस्थानी भाषेंत झालीं व त्यांवर मि० इलियट साहेबांनीं फार नामी व चित्तवेधक असें उत्तर दिलें. रा. सा. नारायणभाई डायरेक्टर, मि. एटकिन साहेब व विद्याखात्याकडील बहुतेक मंडळी या समारंभास होती. पानसुपारीचा बेत मराठी संस्थानच्या प्रमाणें मोठा भव्य होता. विडे काळीचे असून हार मोठमोठाले व कपालखानी होते. इलियट साहेबास अशा समारंभाचे बडोद्यास जे पुढें अनेकवार प्रसंग येणार त्याचा आरंभ येथेंच झाला असें त्यांस व सर्वांस वाटलें असेल. पानसुपारी झाल्यावर इलियट साहेबांनीं सर्वांस क्षेम कुशल विच्यारून उल्हासभरित अंतःकरणानें त्यांचा निरोप घेतला.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं डा० सिक्लेर साहेब माजि डायरेक्टर यांच्या स्मरणार्थ फंड जमत आहे त्यांत मि० इलियट साहेब यांनीं ५० रुपये देण्याची आपली इच्छा कळविली.

यवतमाळच्या पुढारी मंडळींनीं तेथील खंडोबाचे जत्रेंत या महिन्यांचे तारीख २०, २१ व २२ या तीन दिवशीं कांहीं परोपगिचे खेळ. शर्यती वगैरे करावया व त्यांस बक्षिसें द्यावयाची तजवीज योजून त्या बद्दल जाहिरात पाठविली ती आजचे पत्रीं आह्मीं सर्वांस समजण्याकारतां प्रसिद्ध केली आहे. या समारंभास ठिकठिकाणच्या बहुत लोकांनीं व शर्यती सारखे घोडे गाड्या ज्यांकडे असतील त्यांनीं जावें अशी पुरस्कर्त्या मंडळीची फार इच्छा आहे. व त्याप्रमाणें हौसेनें जे जे जातील त्यांस रहाण्यास जागा वगैरेची व्यवस्था सोयवार करून देण्यांत येईल व कोणते गोष्टीची अडचण पडणार नाहीं असेंही सर्वांस कळविण्याची आह्मांस शिफारस झाली आहे. तर हें ऐकून ज्यांची ज्यांची ही मौज पहाण्यास जाण्याची सोय असेल व ज्यांस मनोत्साह असेल त्यांनीं अवश्य जावें. आणि तेणेंकरून यवतमाळच्या लोकांचा हेतु सिद्धीस जाऊन पुढें ठिकठिकाणीं असे प्रसंग वारंवार घडून तेणें करून देशांतील व्यापार, दळणवळण, उद्योग, व निर्दोष कर्मणुकीचे प्रकार वाढावे अशी आमची इच्छा आहे.

अकोल्यास तूर्त पोलिसाचा बंदोबस्त ढिलाइचा दिसतो. शहरांत चोऱ्या होऊं लागल्या आहेत. बुधवारीं रात्रीं काळ्या मारुतीजवळ रा. रा. माधवराव हरि यांचे घरीं चोरी होऊन सुमार १७५ रुपयांचा विषय एका पेटींत होता ती पेटीच उचलून नेली. व मंगळवारीं रात्रीं त्याजनजीक रा. रा. लक्ष्मण भास्कर यांचे मुलाचे गळ्यांतील सोन्याची सरी गेली, पोलिसानें हुशारीनें याचा पत्ता लावावा व चोरास दहशत पाडावी हें योग्य आहे. असो. पोलिस काय करिते तें पाहून आह्मी पुढें या विषयीं आणखी लिहूं.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेंत अकोल्याहून गेलेले बहुतेक मुलगे इंग्लिश भागांत पास झाले व उमरावतीचेही सर्व पास झाल्याचें समजतें. सर्व रिझल्ट अजून समजला नाहीं. एकंदर सुमार ८०० विद्यार्थी इंग्लिश मध्यें पास झाले असें समजतें.

## वर्तमानसार

जपान देशांत आजपर्यंत तंबाकूवर कर नव्हता तो या महिन्याचे पहिले तारखेपासून बसला असें समजतें.

रशिया देशांत स्त्रियांना फटके मारण्याची शिक्षा देण्याची वहिवाट आहे ती बंद करणार.

जी आय पी रेलवेनें कांहीं गार्ड लोकांस काढून दिलें होतें त्याविषयीं पुन्हा विचार करून त्यांस नोकरीवर बहाल केलें. दीड महिन्याचे पगार मात्र त्यास दिले नाहींत.

जळगावास एक धर्मार्थ दवाखाना होणार आहे.

मुंबईस पायधणीजवळ गेले मंगळवारीं रात्रीं आग लागून कित्येक घरें जळालीं. नुकसान ८०००० रुपयांचें झालें. बांधलेलीं गुरें ३० मेलीं. मनुष्यें आग लागतांच सावध होऊन पळालीं.

मि० डोसाभाई फ्रामजी मुंबई पोलिसचे सेकंड माजिस्ट्रेट हे आजारी आहेत ह्मणून रा. बा. नाना मोरोजी यांस अक्टिंग सेकंड माजिस्ट्रेट नेमिलें व मि० पी. रायन पोलिटिकल खात्यांतील असिस्टंट सेक्रेटरी यांस आफिशियेटिंग थर्ड माजिस्ट्रेट नेमिलें.

दिल्लीस जानेवारी महिन्यांत प्रिन्स आफ वेल्स तेथें गेले ह्मणजे फौजांची एक मोठी टेलिजंग कवाईत होणार आहे. ती पाहण्याकारितां व तिजबद्दल रिपोर्ट करण्याकारितां अमेरिकेहून स्वतंत्र संस्थानांच्या सरकारानें कांहीं लष्करी सरदार लोक पाठविले आहेत व ते मुंबईस येऊन दाखल झाले आहेत असें समजतें.

सरकारानें सांगशन केल्या नाहींत अशा सोडतीच्या जाहिराती वर्तमानपत्रांत छापित जाऊं नयेत व छापिल्या असतां त्यावर फौजदारी कायद्याचा अंमल चालेल असें वायव्य प्रांताचे सरकारानें तिकडील वर्तमानपत्रांस कळविलें आहे.

मेलबोर्न येथें १७०० फूट जमिनीखालीं सोनें सापडलें तेव्हां तेथील खाणी फार मातबर असाव्या असें अनुमानानें तिकडे त्या शोधाचें काम मोठ्या भरभराटीनें चालविण्यास आशा उत्पन्न झाली आहे.

सर मंगळदास नथूभाई यांनीं आपल्या दोन मुलांचीं गेल्या २१वे तारखेस लग्नें केलीं त्यांच्या स्मरणार्थ आपली ३९००० रुपये खर्चून बांधलेली धर्मशाळा कपोलवाणी लोकांतील अनाथ पंगूकरितां दिली. व त्यांच्या शुश्रूषेकरितां २९००० रुपयांचें फंड दिलें.

अमीरखान वहाबी कैदेंत आहे त्याला सोडविण्यासाठीं त्याच्या मित्र मंडळीचे प्रयत्न चालू आहेत. त्यांनीं व्हाइसराय यांस एवढाच एक अर्ज केला आहे कीं अमीरखान यांचें वय हल्लीं ८६ वर्षांचें आहे तेणेंकरून त्याची वृद्धावस्था फार कठीण आहे व त्याची मागील वर्तणूक फार सभ्यपणाची होती याजवर नजर देऊन दयाळूपणानें त्यास सोडून द्यावें.

मि० मेलविल साहेब सिंधचे जुडिशियल कमिशनर २० महिन्यांचे रजेवर बिलायेतेस गेले होते ते परत आले.

सुएजची संयोगी भूमि फोडून कालवा केला आहे त्याखचांत ईजिप्तच्या राजाचे जे हक्क आहित ते ४ कोटि रुपयांस इंग्रज सरकारानें विकत घेतले.

उदेपुरच्या महाराण्याचे चुलते कांहीं वाईट कामांत आढळल्यावरून त्यास पोलिसाचे जाबत्यानें काशीस रवाना केलें आहे

रा० भाऊ खेडकर यांस बडोदे संस्थानांत जागा द्यावी अशी जनरल मीड साहेब रेसिडेंट यानीं सरकारास शिफारस केली आहे.

---

## श्री. मल्हारराव गायकवाड यांचा विलाप.

श्लोक.

शा० वि०

हा देवा परमेश्वरा गुणनिधे,
कां रोष केला असा;
अन्यायाविण दीर्घ दोष मजला,
आला प्रभो हा कसा ॥
ज्यानें प्रेमभरें प्रजेस दिधलें,
सौख्यासि पोषूनियां;
तो मी आज प्रिय प्रजेस सहसा,
जाणार सोडोनियां ॥१॥
निर्दोषी परि सापराध गणुनी,
नेती मला ओढुनी;
एकाकी न सवें प्रिया, सुत सुता,
भेटी अतां कोठुनी ॥
मत्कार्जी त्यजणार प्राण जन जे,
त्याहीं मला सोडिलें;
हा दैवा विपरीत रीत तुझि ही,
हें काय त्वां मांडिलें ॥ २ ॥

आर्या.

गीति.

कुस्वप्नें पडलीं जीं,
झालीं सत्याचि, न मानिलें त्यांस ॥
सजलों धीटपणानें त्यां,
अनृत करायासि घालुनी कांस ॥ १ ॥
मम पुत्राही न मिळे,
राज्य असा काय मी गुन्हा केला ॥
ईशा या दीनाच्या,
कां सखया ऐकशी न हाकेला ॥ २ ॥

साकी.

अन्न पाणि प्रिय काहि न लागे
तळमळतो हा दीन ॥
धाव संकटीं प्रभुरायारे
दया न होऊं ऊन ॥१ ॥
जाया सुत, प्रिय सुहृद जनाविण
नेति मला परदेशीं ॥ २ ॥
काय करूं या संकट समयीं ॥
तुजविण साह्य असेना ॥
कृपा करी सोडवी दयाळा ॥
धीर अतां धरवेना ॥३॥

दिंडी.

कोण संकट बोखटें प्राप्त झालें,
मूल तान्हें राज्यासि अंतरीलें !।
काय येथें अन्याय असे त्याचा;
अहा दैवा हत भाग्य मींच साचा ॥१॥

ओवी

डाग लाविला म्यां कुळासी ॥
धिक्कार असो माझे जिण्यासी ॥
इच्छा होती मम मानसीं ॥
न्याय साच होईल ॥१॥
परी हें जग असे उलटें ॥
सत्याचें होतसे खोटें ॥
मम पूर्वजांचें भाग्य मोठें ॥
निरपराधी ठरलों मीं ॥२॥
परी आश्चर्य वाटे मजला ॥
जरी मी निरपराधी भला॥
तरी हा असह्य मजवरी घाला ॥
काय कारणें कळेना ॥३॥
राजा सुखी जन ह्मणती ॥
यावा कुळीं जन्म ऐसें बोलती ॥
परी पाहतां माझेच स्थिति ॥
संशय समूळीं जाईल ॥४॥
सर्व आतां कळोन आलें ॥
दुष्ट लोकीं मज गांठिलें ॥
अरमतलबीपणाच्या बोलें ॥
भुरळ घातलें मजलागीं ॥५॥
नाना दुष्ट कृत्यें केलीं त्यांनीं ॥
राज्य, संपत्तीची धुळधाणी ॥
उडवोनि आपण धाले धणी ॥
प्रसंग पडतां उलटले ॥६॥
धरणी माताच मज त्रासली ॥
दुःखांची धाड कोसळली ॥
पूर्ण ठोकर लागली ॥
डोळे आतां उघडले ॥७॥
राजकुळीं जन्मलों व्यर्थ ॥
केला प्रपंच ना परमार्थ ॥
दुष्ट लोकांचा स्वार्थ ॥
नोळखोनी केला म्यां ॥ ८ ॥

वंशस्थ

वाटे जरी प्राण निघोन जाता ।
सोडोनि हा देह बरें विधाता ॥
झाला असा निष्ठुर कां कळेना ।
स्नेही सखा आप्त कुणी मिळेना ॥१ ॥

गीति

कारागृह बरवें मज ।
वाटे तें दुःख मज नसे लेश॥
राज्यपद प्राप्त झालें ।
तैपासुनी भोगिलि बहू क्लेश ॥ १ ॥
शेवट अजि हा झाला ।
जन्मुनि म्यां व्यर्थ दुखविली माता
बहुविध सोसुनि दुःखें।
अंतीं मज काय लागलें हाता ॥ २ ॥
कष्टांतां सुख ऐसे ।
सज्जन वदले न तें खरें वाटे
भावी स्थिति आठवतां।
देवा माझे खरें हृदय फाटे॥ ३ ॥

शिखरिणी

प्रभो राखी आतां ।
कुशल मम कन्या सुत प्रिया॥
अहो गेलें सारें ।
विषय सुख माझें चिर लया ॥
कशी कंठूं आतां ।
दिनरजनि त्यांवीण स्थिति हे।
अनाथाच्या नाथा।
प्रिय तुज गमे काय रिति हे ॥ १ ॥

स्त्रग्धरा

ज्यांपाशीं सख्य केलें ।
बहु दिन वडिलीं तेंचि म्यां चालवीलें
यातत्पर्यंत ज्याशीं
अकपट सुमति प्रेमही वागवीलें ॥
अंती सोडोनि त्यांहीं
नयनिति अवघी भ्रष्ट केलें मला कीं ।
राज्यापासून ईशा ।
त्रिभुवनपाति तूं सुज्ञ चक्षू न झाकी ॥

सूर्योदय.

---

## भावाचें बळ.

परमेश्वराचें नाम भक्तिपुरस्सर व प्रेमपुरस्सर आणि त्याचा महिमा मनांत वागवून घेतलें असतां आपलें अंतर्याम शुद्ध करितें. आणि आपल्या दुःखाचा व चिंतेचा परिहार करून आनंदाचा लोट आणितें असें मागें सांगितलें आहे. हा सर्व प्रकार क्षणांत होतो. परमेश्वराचें पवित्र नाम कानीं पडतांच कामक्रोधादिक मनोविकार जसें कांहीं भिऊन पळतात आणि नष्ट होतात. याच कारणामुळें भाविक जन त्या परम पवित्र नामावर अत्यंत आसक्ति ठेवून अंतःकरणाच्या शुद्धतेचें तें मोठें प्रबळ साधन आहे असें समजतात. ते शुद्ध परमेश्वरावर भक्ति ठेवितात तशीच त्याच्या नामावरें ठेवितात. त्या नामाच्या अंगीं शांति, ज्ञान, प्रेम, पवित्रता त्यांस भासतात याचें कारण उघड आहे. भाव शद्बाच्याठायीं शक्ति उत्पन्न करितो आमचा भाव असतो त्याप्रमाणें आह्मी वर्ततो आमच्या भावाप्रमाणें आमच्या अंतःकरणाची स्थिति असते. शद्बाच्या अंगीं कांहीं शक्ति नाहीं आणि तोंडानें कांहीं ह्मणणें व गाणें यांपासून कांहीं उपयोग नाहीं असें आपण मानूं लागलो ह्मणजे खरोखरच त्यांपासून कांहीं उपयोग नाहींसा होईल. याचप्रमाणें हजारों लोक परमेश्वराच्या नांवाचा घोष करितात; परंतु त्याजवर त्यांचा भाव नसल्यामुळें त्यांचीं अंतःकरणें पवित्र होत नाहींत. परंतु त्या नामघोषानें आपल्या पापाचें प्रक्षालन होऊं शकेलच असा मनांत भाव धरून तो केला असतां तें कार्य त्यापासून होईल. भावाच्या अंगीं अशी कांहीं शक्ति आहे कीं, तो हिमालयासारखे प्रचंड पर्वत ढळवूं शकेल. ही भावाची शक्ति केवळ परमेश्वराचें नाम घेण्यांत मात्र दिसून येते असें नाहीं, तर ती अन्य रीतींनींही दिसून येते. आपला भाव असला तर अगदीं सामान्य वस्तूही आपल्या उद्धराचें साधन होतात. फार तर काय पण भाविक जनास धूळही मोक्षाचें साधन होतें. याप्रमाणें भाविक जनास प्रत्येक पदार्थापासून धर्मबोध होतो; परंतु अभाविक जनास कशांतही ईश्वर दिसत नाहीं. तो स्वसुधारणेचे सर्व उपाय व्यर्थ करूं पाहतो आणि आपल्या पापवृत्तीचें दमन करण्याची शक्ति कशामध्येंही नाहीं असा अंतीं सिद्धान्त करून स्वस्थ बसतो. परतु जो जन भाविक आहे त्यास सर्व सृष्टि हें ईश्वरप्रणात शास्त्र दिसतें. कोणत्या वस्तू ईश्वरप्राप्तीस साधनीभूत होतील असें कोणी विचारलें असतां आमच्या मतें त्यास उत्तर हेंच कां, सर्व वस्तू होतील किंवा कोणतीच वस्तू होणार नाहीं. आपली श्रद्धा असली तर प्रत्येक वस्तूपासून आपल्या आध्यात्मिक सुधारणुकेस मदत होईल, परंतु ती श्रद्धा नसली तर कशापासूनही होणार नाहीं भाविकजनात झाडांच्या पानाचें सळसळणें आणि ओढ्यांच्या पाण्याचें खळखळणें यांपासूनही बोध होतो परंतु अभाविकांस ग्रंथापासून, गुरूपासून व सत्संगापासून नही कांहीं लाभ होत नाहीं. भाविकांस अंधाराचा उजेड होतो. अभाविकांस उजेडाचा अंधार होतो. सर्व सृष्टी भाविकांस सहाय्यकारिणी होते. त्याला आत्मोन्नतीस सहाय्याची उणीव कधीं पडत नाहीं. एवढें मोठें भावाचें बळ आहे. सु. प.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनूसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस

REOPENING OF THE KHAMGAON STATE RAILWAY.

## खामगाव स्टेट रेलवेची पुन्हा सुरुवात.

डिसेंबर महिन्याची तारीख १० रोज शुक्रवार या दिवशीं व त्यापुढें खामगाव स्टेट रेलवे उतारू व माल यांकरितां पुन्हां पूर्वीप्रमाणें चालू केली जाईल; व या दिवसापासून पुढें दुसरी नोटिस लागेपर्यंत नागपुर डाऊन ट्रेन (मुंबईकडे जाणारी गाडी ) च्या संबंधानें जलम आणि खामगाव याचे दरम्यान खालीं लिहिलेल्या वेळावर एक मिक्सड ट्रेन (उतारू व माल मिळून ) दर रोज जात येत जाईल.

**खालून जाणारी गाडी ( डाऊनट्रेन. )**

जलमहून निघेल सकाळीं १० अवर १५ मि
खामगावाला पोचेल ,, ११ वाजतां.

**वरून जाणारी गाडी ( अपट्रेन )**

खामगावाहून निघेल रात्रीं १० अवर ४० मि
जलमला पोचेल ,, ९ ,, ३० मि.

खामगावहून या रेलवेच्या किंवा कोणत्याही स्टेशनाला थेट उतारू, माल व पार्सलें (निळ्य) घेतल्या जातील. व तिकडून खामगावाला थेट आणिल्या जातील.

खामगाव येथें कापूस व इतर माल या कंपनीनें गोळा करण्याचें व बगोवर पोचवून देण्याचें काम सोडून दिलें आहे. यासाठीं यापुढें लोकांनीं आपआपला माल व कापूस स्टेशनावर आणून पोचविण्याची व तेथून घेऊन जाण्याची तजवीज केली पाहिजे. कार्टिंग ह्मणजे माल घरून स्टेशनवर आणणें व स्टेशनावरून घरीं पोचविणें या दल जो एकट्टा च्यार्ज्य ह्मणजे शिवाय खर्च लागत होता तो यापुढें घेतला जाणार नाहीं. त्याशिवाय जो दर घेण्याचा शिरस्ता आहे त्याप्रमाणें सर्व प्रसंगीं आकार घेण्यांत येईल.

दरदाम वगैरे विषयीं माहिती स्टेशनावर किंवा या नोटिशीखालीं सही करणाराकडे मिळेल.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० ८ माहे नवेंबर
सन १८७५ इसवी.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा.

वसांत

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ — अकोला, रविवार ता० १२ माहे डिसेंबर सन १८७५ इ० — अंक ५०

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती.

### मल्हाररावाचें नाटक.

या नावाचीं मनोरंजक पुस्तकें वऱ्हाड समाचार छापखान्यांत विक्रीस आलीं आहेत. किंमत दर प्रतीस एक रुपया दोन आणे. बाहेर गावीं मागविणारास टपाल हशीलाबद्दल दोन आणे शिवाय लागतील.

### प्रेमबंधन,

या नावाची सुरस व मनोरंजक उत्तम कादंबरी नुकतीच छापून तयार झालेली वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीकरितां आली आहे. किंमत दीड रुपया. बाहेर गावचे घेणारास डाक हशील तीन आणे शिवाय पडेल.

### पत्राच्या शिलकी बाक्यांवर व्याज द्यावें लागेल.

आमच्या कित्येक वर्गणीदारांकडे दोन दोन व तीन तीन वर्षांच्या बाक्या येणें राहिल्या आहेत त्या त्यांनीं आतां खानगी रीतीनें लवकर पाठविल्यास आह्मांवर त्यांची मोठी मेहेरबानी होईल व त्यांची आणि आमची दगदग चुकेल. आणि अशी त्यांनीं कृपा न केल्यास निरुपायामुळें त्या बाक्या कायदेशीर रीतीनें वसूल करणें आह्मांस भाग होईल; आणि तसेंच करावें लागेल तेव्हां प्रत्येक सालची बाकी घेण्यास योग्य झाल्या दिवसापासून तिचें व्याज दरमहा दर शेकडा दोन रुपये प्रमाणें जें आकारेल तें तिजवर चढवून वसूल करण्याची तजवीज केली जाईल हें सर्वांस अगाऊ कळविण्यांत येत आहे.

तसेंच साल दरसाल बाक्या मागण्याकारितां इकडून वेळोवेळां पत्रें लिहिलीं आहेत व पुढें लिहिलीं जातील त्यांचा टपालखर्च व मुद्दाम मनुष्य पाठवावे लागल्यास त्यांचा खर्चही त्या त्या कुळांवर आकारला जाईल हेंही सर्वांस कळावें. तारीख ७ माहे नोवेंबर सन १८७५ इ०

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नोटिसा.

राजश्री हिंमतराम व नानूराम मारवाडी दुकान कुटासें तालुके अकोट यांस पेमराज ठाकुरदास मारवाडी दुकान कुटासें तालुके अकोट जिल्हे अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, संवत १९२७ सालापासून हिंमतराम व किसनदास व नानूराम व पेमराज असे चौघामिळोन दुकानदारी मौजे कुटासें येथें शराकतींत ठरवून कस्तुरचंद पेमराज या नावची दुकान चालू केली. व वहिवाट पेमराज वें नानूराम मिळून आजपावेतों ह्मणजे कार्तिक शुध्ध १ संवत १९३२ पावेतों चालत आली. हल्लीं हिंमतराम येऊन नानूराम याजला आपले ताब्यांत करून घेऊन दुकानदारींत माझी वहिवाट बंद केली आहे. आणि तुह्मी दोघेमिळोन मागील देण्या घेण्याच्या असाम्या आहेत त्यांचा हिशेब वगैरे न करिता हिंमतराम व नानूराम या नावाचे नवीन रोखे घेता. त्या असाम्यांकडून जें घेणें आहे तें तसेंच ठेवून व कांहीं नगदी देऊन रोखे घेता. मागील दुकानदारीच्या वह्या तुह्मी आपले ताब्यांत ठेवून घेतल्या आहेत, आम्ही मागावयास आलो असतां तुह्मी शिव्यागाळी देता. मजला कांहीं दुकानदारीबद्दल समजूं देत नाहीं असें करणें सावकारी रीतीस ठीक नाहीं. ज्यां लोकाकडून पैसा घेणें आहे त्याजकडून पैसा वसूल करण्याचा हा वक्त हंगामाचा आला आहे. वसूल न झाल्यास व कायद्यातून गेल्यास सर्व बाबी जबाबदार तुह्मी आहा. मी होणार नाहीं. कारण कीं माझी वहिवाट बंद केली आहे. वह्याचे रुईनें जो नफा निघेल तो बिनजोखीम मी घेईन यांत अंतर नाहीं. याजकरितां नोटिस देतो कीं तुह्मी बेरीतीची वहिवाट केली ती बंद करून वह्या माझ्या ताब्यांत नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत देऊन लोकांकडून पैसा वसूल करून द्यावा व हिशेबही करून माझा पैसा मजला घेऊं द्यावा. तुह्मी समजावें कीं जों पावेतों माझा निकाल न होईल तों पावेतों पाती माझी बहाल आहे वर लिहिलेप्रमाणें तुह्मी न केल्यास नोटिशीचे खर्चासह नफ्याची फिर्याद तुमचेवर करून उलगडा केला जाईल हें आपणास कळावें तारीख ६ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

(सही) पेमराज ठाकुरदास मारवाडी दस्तुर खुद्द

### नोटिस.

साजी मर्द पामा माळी मौजे मांडके तालुके मलकापुर इजला, पामा वल्लद शामजी माळी वस्ती खुर्द अकोलें तालुके जळगाव याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको आहेस तुझ्यासी माझें लग्न झाल्यास सुमार १० वर्षें झालीं तूं लहान होती तेवेळेस रीतीप्रमाणें येणें जाणें होतें आलीकडे तीन च्यार वर्षांत तूं मुळींच आली नाहींस वेळो वेळ आह्मी जातीनें तुला न्यावयाकरितां येत होतों व गाडी माणसें पाठवित होतो परंतु आली नाहींस. मागाहून येते अशा थापा दिल्या. आलीकडेस दोन वर्षें झालीं तुजला पदर आला आहे आतां बापाचे घरीं राहाणें गैरअब्रूचें आहे व माझा संसार झाला पाहिजे याजकरितां ही नोटिस मुदाम देऊन असें कळवितो कीं नोटिस पोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत तूं आमचे घरीं निघून यावें न आली तर रीतीप्रमाणें तुजला ताब्यांत घेण्याची कायदेशीर तजवीज केली जाईल. लोकाचें सांगो सांगीं माझे एकण्यांत आलें कीं तूं माझी लग्नाची फारकती ह्मणून एक खोटा कागद बनविला आहे ही गोष्ट खरी असल्यास व तो खोटा कागद चालविल्यास तो माझे संमताचा नाहीं याजकरितां व त्याच्या आधारानें तूं कदाचित दुसरा गंधर्व करशील तर तुजवर व गंधर्वाचे नवऱ्यावर आणि गंधर्व करण्यास मदत करणारे लोकांवर फौजदारी होईल व कैदेच्या वगैरे शिक्षा होतील हें समजून करणें असेल तें करावें व या नोटिसीचा जबाब नोटिस पावताच कळवावा तारीख ८ माहे डिसेंबर सन१८७५ इसवी

( सही ) पामा वल्लद शामा माळी
याच्या हातची निशाणी
रेघ.

### नोटिस.

ह्मसाजी वल्लद दावल वरठी वस्ती दाताळें तालुके मोर्तिजापुर जिल्हा उमरावती यास खालीं सही करणार याजकडून नोटिस अशी कीं तुह्मी आपली मुलगी माझा भाऊ चाहादू याजला देण्याचें कबूल करून मजपासोन रुपये २५ पंचवीस घेतले. आतां मुलगी देत नाहीं व घेतलेले रुपयेही देत नाहीं करितां ही नोटिस दिली आहे. ती पावल्यापासून आठ दिवसांत आमचा निकाल करावा न केल्यास तुह्मावर फिर्याद करण्यांत येईल कळावें तारीख ८ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

[सही ] माहादू वल्लद सदू वरठी
निशाणी खुद्द.

### नोटिस

सुरेभान वल्लद अकाजी पाटील मुकद्दम मौजे अळंदे तर्फ लैसपुर तालुके अकोलें यांस खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मांकडून पुरज्याबद्दल रुपये १०० शिवाय व्याज घेणें आहे ती रकम आजपर्यंत तुह्मी दिली नाहीं याजकरितां मुद्दाम नोटिस दिली आहे. तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत सर्व रुपयांचा उलगडा करावा. नाहीं तर रीतीप्रमाणें तुह्मावर तजवीज केली जाईल. व खर्चासुद्धां सर्व रकम भरून घेतली जाईल. कळावें तारीख ९ डिसेंबर सन १८७५ इसवी.

[ सही ] विठोबा वल्लद परशराम देशमुख एरंडेकर परगणें अकोले दस्तुर खुद्द

### नोटिस.

महादाजी वल्लद गंभीरजी खांबलेकर पाटील रहाणार धावें परगणें बारशी टाकळी तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते. कीं, तुह्मांकडून पुरज्याबद्दल रुपये १०० शिवाय व्याज घेणें आहे ती रकम आजपर्यंत तुह्मी दिली नाहीं याजकरितां मुद्दाम नोटिस दिली आहे. तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत सर्व रुपयांचा उलगडा करावा. नाहीं तर रीतीप्रमाणें तुह्मावर तजवीज केली जाईल व खर्चासुध्धां सर्व रकम भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ९ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

(सही) विठोबा वल्लद परशराम देशमुख एरंडेकर परगणे अकोलें दस्तुर खुद्द.

### नोटिस

कुकाजी वल्लद उमाजी चांभार वस्ती जानोरी परगणें पिंजर तालुके अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मांकडून पुरज्याबद्दल रुपये २५ शिवाय व्याज घेणें आहे ती रकम आजपर्यंत तुह्मी दिली नाहीं याजकरितां मुद्दाम नोटिस दिली आहे. तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत सर्व रुपयांचा उलगडा करावा. नाहीं तर रीतीप्रमाणें तुह्मावर तजवीज केली जाईल व खर्चासुद्धां सर्व रकम भरून घेतली जाईल कळावें तारीख ९ डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) विठोबा वल्लद परशराम देशमुख एरंडेकर परगणें अकोलें दस्तुर खुद्द.

### नोटिस

लक्ष्मण वल्लद यंगोजी गोंधळी वस्ती दहिहंडे तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं. तुह्मांकडून पुरज्याबद्दल रुपये १२॥ अक्षरी साडेबारा शिवाय व्याज घेणें आहे ती रकम आजपर्यंत तुह्मी दिली नाहीं याजकरितां मुद्दाम नोटिस दिली आहे. तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत सर्व रुपयांचा उलगडा करावा नाहीं तर रीतीप्रमाणें तुह्मावर तजवीज केली जाई-

ल व खर्चासुद्धां सर्व. रकम भरून घेतली जाईल कळावें तारीख ९ डिसेंबर सन १८७५ इसवी.|

[ सही ] विठोबा वल्लद परशराम देशमुख एरंडेकर-परगणें अकोलें दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुध्ध १५ शके १७९७.

## MEETING IN HONOUR OF MR. ELLIOT'S DEPARTURE

A meeting of the members of the Educational Department and other respectable citizens of Akola was held in the Anglo-Vernacular school house at 5 P. M. on the 30th of november 1875 to bid farewell to F. A. H. Elliot Esqr. c. s. on the occasion of his departure to Baroda to take up the appointment of tutor and governor to His Highness the young Gaekwad. Rao Saheb Narayen Bhai Dandekar, Mr. G. C. Aitken and other members of the Educational Department, Messrs Bhaskar Sakharam, Bhaskar Maheshwar, Sadasheo Narayen, Khunderao Balaji, Gopal Mahadeo, Sadasheo Vishnoo, Jorawar Khan, Salim Khan, Abasbeg &. &. &. were present. The meeting was opened by Mr. Vishnoo Moreshwar Mahajani M. A. who spoke as follows:-

Sir- on behalf of the Native community of Akola I wish to address you the following few words. This is one of those sad occasions which from time to time fall to the lot of every individual. We have assembled here, Sir, to express our sense of respect and gratitude we feel for you. We are both sorry and glad on this occasion—sorry, because you are going to leave us and glad, because you go on promotion. I am sure I express the united sense of the community when I say we extremely regret the loss of your able services to the Educational Department of Berar, the intellectual destinies of which you ruled, directly or indireetly, for the last two years and-a- half. Under your strict but just superintendence all the schools in Berar have received a very healthy tone. It was you who infused life and spirit into the middle-class scheols. You followed the policy of promoting deserving men in the department, while at the same time you brought in new men from the Bombay presidency to fill up the vacancies for which there were no competent men on the spot. The interest you took in the welfare of the department was intense and cannot be too highly praised. As regard the intercourse with natives, your house was open to all, and as regards the way in which you treated them, it is sufficient to say you were a thorough gentleman. In conclusion, we beg to assure you that, wherever you may go, our wishes for your health and prosperity will always attend upon you.

Mr- Shriram Bhikajee Jatar B. A., then rose and spoke as follows:—I would add very little to what Mr. Mahajani has said. Sir, it is not necessary to allude to the benefits which you confered upon the Educational Department in your short tenure of office and to the good which you intended to do had you remained longer in Berar. I would say only one thing. Yon are aware, Sir, that various circumstances have combined to keep the European and native communities at a great distance from each other, and this circumstance, as every bodyknows, is liable to create distrust and misunderstanding. Now I know from sufficient experience that you tried your best to diminish this distance as much as possible. You will be long remembered, Sir, in this province as one of those who take delight in endeavouring to make themselves acquainted with native manners and character, who treat the natives and even subordinates in a kind courteous manner, and who, though scrupulously just in award ing rewards and punishments, have always the good of the community at heart. It is but natural that natives should feel highly honoured at the recent change in the administration of this department but at the same time we deeply regret the circumstance that the department has lost the services of a hardworking and highly intelligent officer, whose sense of duty is only equalled by his indefatigable industry. But, Sir, we cannot help congratulating ourselves, as forming a part of the great Mahratta nation that you have been selected to under take duties of a highly important character—duties of moulding, as it were, the mind of a young Prince and training him in the art of governing a kingdom which has long been suffering from misrule. I can say nothing more. It is imposible to express adequately our mixed feelings of joy and sorrow on this occasion. Only allow us to wish you a long life and prosperous career.

Messrs. Mahomed Zahirudin and Mahomed Ismail then spoke in Hindoostani, and Messrs. Khunderao Balajee and Sadashiw Visnu in Marathi. These speeches eloquently described the services of Mr. Elliot done to the cause of education in Berar and his courteous treatment of natives, His discernment of native character and his appreciation of the abilities of his subordinates were dwelt upon by all the speakers.

Mr. Elliot then addressed the meeting as follows:—Mr. Shriram Bhikajee Jatar, and Gentlemen,—I am obliged to you for the opportunity you have given me of meeting you here in a body to bid you friendly farewell- I am also obliged to you for your good wishes and the kind way in which you have made mention of my slight services in the Educational Department. Indeed, my connection with the department has been slight and unimportant. As Educational Inspector, I had to learn my work, as officiating Director I served for a few months to stop a gap between the death of the late Dr- Sinclair and the accession of Rao Saheb Narayen Bhai Dandekar. On this point I wish to say a few words. The Government of India has decided upon making an experiment in Berar and for the first time has committed a whole department to the care of a native gentleman. I trust that the experiment may succeed; but remember, it rests less upon the new Director — I have only for a few days had the pleasure of Mr. Narayen Bhai's acquaintance, but have formed a high opinion of his practical good sense—than upon you all who are to work with him. The present prosperity of the Educational Department is, I think, less owing to the exertions of Dr, Sinclair and Mr, Candy than to the zealous co-operation these gentlemen always received from Deputy Educational Inspector like Messrs, Shriram Bhikajee and Zahirudin, from assistants in the high shools like Mr. Vishnoo Moreswur, head clerk, like Mr. Waman Balajee, curator, like Mr. Waman Krishna, and masters in the middle and lower class shools, such as I see present here to-day. I am glad that when the time came when the department was to be handed over to the direction of a native gentleman, it could be said that there always existed a very friendly feeling between the English officers at the head of the department and his subordinates. I am not referring so much to the kindness which has led you to convene this meeting as to the greater proof you have shown of your good will in raising a subscription to found a scholarship in memory of the late Dr. Sinclair, a sincere token of your friendship. Gentlemen, there are some among you with whom I have had great pleasur in working during the past two and a half year. From them I hope from time to time to hear of the continued progress of the Educational Department and of the general advance of education in the Hyderabad Assigned Districts. Gentlemen, I bid you farewell. ( Loud cheer. )

This was followed by the distribution of Pan Soopari, flowers, &c., &c., and the, proceedings then terminated.

---

### ✓ मि० लीवार्नर साहेब.

मागें थोडे दिवस येथें हे डायरेक्टर आले होते त्यानीं मुंबईस कांहीं पार्शी लोकांच्या गाड्यांच्या पुढें आपली गाडी जावी ह्मणून एका पारशास चाबुक मारला. तेव्हां १५।२० पार्शी तेथें येकत्र जमून मारामार झाली. तिजबद्दल लीवार्नर साहेबानीं फौजदारींत फिर्याद केली आहे. त्यांचा साक्षी पुरावा झाला व आरोपितांचा डिफेन्स झाला. आतां आरोपितांनीं माजिस्त्रेटाकडे लीवार्नर साहेबावर समन्स मागित ल्यावरून त्यांस मिळालें आहे तेव्हां लीवार्नर साहेब आरोपी होऊन पुन्हा ती चौकशी होईल. एवढी खटपट साहेब बहादुरांनीं केली नसती तर बरें होतें. पण त्यांचा स्वभाव तापट व ते सरकारचे अंडर सेक्रेटरी तेव्हां ते इतर लोकांच्या गाड्यामागून कसे चालतील? या मुकद्दम्यांत पहिलीं आगळीक साहेबाची दिसते व पाठीमागून पारशी लोकांनीं त्यांची पुष्कळ कणीक तिंबली असें दिसतें! अखेरीस काय ठरतें व हुकूम काय होतो पहावा.

---

### ✓ राजपुत्रांस युरोपियन शिक्षक

आलीकडे ह्मैसूर, हैदराबाद, बडोदें येथील वहिवाट पाहिली असतां सरकारानें लहान लहान वयाच्या राजपुत्रास हजारो रुपये पगाराचे युरोपियन शिक्षक नेमून दिले अहित असें आढळतें. राजपुत्राच्या स्थितीस या बड्या बड्या शिक्षकांचा काडीभर देखील उपयोग नाहीं. कारण त्यांचीं हल्लींचीं वयें हजार पंध्राशें रुपये पगार मिळविणाऱ्या विलायती विद्वानापासून ज्ञानप्राप्ती करून घेण्यास योग्य नाहींत ह्मणून त्यांच्या खजिन्यांतला इतका मोठा पगार आतांपासून व्यर्थ जावा हें बरें नाही. आह्मांस वाटतें कीं आमचे इंग्लिश सरकार अशा राजपुत्रांना प्रथम पांच च्यार शें रुपये पगाराचे नेटिव विद्वानापासून शिक्षण देईल तर तें त्यांस अधिक उपयोगी होऊन त्यांचा फायदा होईल. सबब या गोष्टीकडे सरकारानें लक्ष्य पुरवावें. वऱ्हाडांतल्या सुमार २०००० मुलांचा डायरेक्टर तो एकऱ्या गायकवाडाचा मास्तर ही केवढी उधळपट्टी !

---

## वऱ्हाड.

मगील आठवड्यांत लिहिल्याप्रमाणें तारिख ४ शनिवार रोजीं सायंकाळीं सर रिचर्ड मीड साहेब हैदराबादचे नवीन रेसिडेंट तेथें जाऊन दाखल झाले. त्यांस भेटण्याकारितां स्टेशनावर बहुत अमीर उमराव गेले होते- सर्वांच्या भेटी झाल्यावर मेजर फ्रेजर साहेब यांजबरोबर रेसिडेन्सीच्या छावणींत गेले.

मि० सांडर्स साहेब माजी रेसिडेंट हे ४ थे तारखेस सकाळचेच गाडीला निघू-

न गेले. अलीकडे कचेरीसही फारसे जात नव्हते व जाते वेळीं आपणास कोणी भेटूं नये अशी त्यांची इच्छा होती असें दिसतें. हमेशाचे रीतीप्रमाणें ते हैदराबादच्या स्टेशनावर गाडींत बसावयास येतील असें वाटून दिवाण साहेब मुकत्यार उल मुलूख, नबाब मुकरूम दवर्ला व दुसरे निजाम सरकारचे बहुत कामगार स्टेशनावर गेले होते. पण सांडर्स साहेब, पूर्व दिवशीं रात्रीं बोलारम येथें जाऊन राहिले होते व तिकडून सिकंदराबाद स्टेशनावर गेले आणि तेथें त्यांनीं आपणाकरितां एक पृथक डबा घेऊन गाडीला अगदीं शेवटास जोडविला. व तो हुसेन सागरचे सांध्यावर सोडवून घेऊन हैदराबाद स्टेशनाकडे जाऊ दिला नाहीं व पुढें गाडी आल्यावर तो तिला पुन्हा जोडविला. मंडळीस हैदराबाद स्टेशनावर समजलें कीं सांडर्स साहेब हुसेन सागर येथें आहेत ह्मणून ते जलदीनें तिकडे त्यांस भेटावयास गेले पण ते पोचण्या पूर्वींच आगगाडी निघून गेली होती. यामुळें सर्व लोकांस फार वाईट वाटलें. सांडर्स साहेबानीं असें करावयाचें नव्हतें. त्यांनां कांहीं राग आला होता कीं काय ठाऊक नाहीं, परंतु आला असला तरी तो एवढ्या पोक्तपणाच्या मनुष्यानें अशा शेवटच्या प्रसंगीं असा व्यक्त करून दाखविणें व थोर थोर लोकांच्या भेटी न घेणें यांत कांहीं मोठेसें शहाणपण नाहीं. आतां त्यांची दुसरी कांहीं सबब असली तर न जाणो.

हैदराबादचे रेसिडेंट सांडर्स साहेब सहकुटुंब सोमवारच्या आगबोटींतून विलायतेस चालते झाले. त्यांच्या जाग्यावर सर रिचर्ड मीड यांची नेमणूक झाली. पण यांत बांबेग्याजेट ह्मणतात तसा बडोद्याप्रमाणें कांहीं तरी रीतीनें निजामशाहाचा घोटाळा करण्याचा बेत नसो ह्मणजे झालें. आमचे सरकार असें वरचेवर वेडें वांकडे करील असें आह्मांस वाटत नाहीं. सर सालरजंग यांस खरोखरच मोठी पंचाईत आहे. कदाचित आतां त्यांची स्थिति मि० दादाभाई सारखी होईल ह्मणून लोकांस भीति वाटूं लागली आहे. या भीतीस कारण आमचे बंधु नेहमीं बांबे ग्याजेटकर्ते होतात. इंदुप्रकाश

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर यांची स्वारी बुलढाण्याकडे आहे.

मेजर अलार्डाइस साहेब जुडिशियल कमिशनर यवतमाळाकडेच आहेत १५वे तारखेस तेथें आणखी सेशन आहे.

रा. सा. नारायण भाई डायरेक्टर यांची स्वारी वाशिमाकडे गेली आहे.

रा. रा. विष्णु सखाराम बापट येथील माजी क्लार्क आफ धि कोर्ट या आठवड्यांत येथें आले आहेत.

रा. रा. गोविंदराज अप्या मोरशीचे तहशिलदार रजेवर आहेत ते इलिचपुर उमरावतीकडून शुक्रवारी येथें आले आहेत.

रा. रा. शामराव रामचंद्र गरूड धुळ्याहून या आठवड्यांत येथें आले आहेत. रा. खुशालराव देशपांडे याजवर हक्क नसून भोगलेल्या उत्पन्नाबद्दलचा त्यांचा दावा आहे त्याची चौकशी चालू आहे.

बांध बरोळ्याचा मोठ्या भानगडीचा कित्येक वर्षें अकोला डिपुटी कमिशनरकडे चाललेला मुकद्दमा क्या० बुलक साहेब यांनीं पंचाकडे सोपला होता व ते सर्व पंच व्यापारी उदमी होते त्यांनी केलेला ठराव पाहून व त्यांतील बहुमत घेऊन बुलक साहेबानीं फैसल केला त्यांत रा. बाबणलाल रामलाल याजवर सुमार ११००० रु० ची रकम घेण्याची निघाली आहे. बाबणलाल यानीं पंचाचे निर्णयावर एक वेळां तक्रारीचा अर्ज फैसल्या पूर्वीं दिला होता त्याचा खुलासा पंचाकडून आणवून घेऊन बुलक साहेबानीं ठराव केला. हल्लींही बाबणलाल यानीं एक भशा मतलबाचा अर्ज केला आहे कीं, पंचाचा निर्णय पक्षपाताचा व लाच लुचपतीचा आहे सबब तो रद्द व्हावा. थोडे दिवसांपूर्वीं पंचाचा निर्णय बाहेर पडण्याचे सुमारास रा० गंगाधर जोरावरमल यानींही पंचावर कांहीं आरोप आणून एक अर्ज केला होता आतां बाबणलालाचे अर्जाचा काय प्रकार होतो पहावा. पंचांत दुफळी नव्हे पण त्रिफळी झाली होती असें ऐकतों.

मि०हार्डेन साहेब उमरावतीचे डिपुटी कमिशनर विलायतचे रजेवर जाण्याकरितां कालरोजीं इकडून मुंबईस गेले. परवाचे दिवशीं उमरावतीचे लोकांनीं राजा बिसनचंद यांचे हवेलींत त्यांस पानसुपारी करण्याकरितां सभा भरविली होती. कोणी कोणीं साहेबाच्या स्तावक च्यार शद्ब बोलले त्याचें उत्तर साहेब बहादुरानीं सभा आटोपून दरवाज्या बाहेर गेल्यावर एक दोन शद्बानीं दिलें व संतोष दर्शविला. सभेचा बेत चांगला झाला होता.

मि० स्प्यानस्की साहेब यवतमाळचे डिपुटी कमिशनर विलायतेहून परत येऊन आपले कामावर रुजू झाले. व क्या० मेकंजी साहेब उमरावतीस येऊन डिपुटी कमिशनरचें काम पाहू लागले.

उमरावतीचे वकील रा. जयराम गणेश या विरुद्ध क्या० मेंजिस साहेब स्माल काज जडज यानीं पूर्वीं रेसिडेंट साहेबास लिहिलें होतें त्याचा निकाल हल्लीं असा झाला कीं वकील मजकूर यांस सहा महिने सस्पेंड करावें. व त्या मुकद्दम्यांतिल त्यांचें सामने वाले दुसरे वकील रा. बाळकृष्ण विनायक यांस सक्त ताकीद द्यावी.

केळापुरचे नायब तहशिलदार रा. तुकाराम कृष्ण मरण पावले त्यांचे जागेवर यवतमाळचे नाजर रा. गोविंद गंगाधर यांस नेमिलें.

अकोल्याचे प्रसिद्ध नाजर नारायण महिपत यास ७ वर्षांची कैद व १९००० रु० दंडाबद्दल ५ वर्षें कैद अशी शिक्षा झाली होती व तिजवर त्यांनीं रेसिडेंट साहेबाकडे अपील केलें होतें त्याचा निकाल मि० सांडर्स साहेब यानीं केला व दंडा ऐवजी ५ वर्षांची कैद होती ती अडीच वर्षांची केली.

याप्रमाणें या नाजर प्रकरणाच्या एका भागाचा निकाल झाला परंतु अजून चोरीस गेलेले १९००० रुपये कोणी भरावे व संसर्ग संबधांत दुसरे लोकांवर दोषारोपण झालें आहे त्याचा निकाल काय, वगैरे भाग शिलक आहेत.

मि. एच. ए हिथ आफिशियेटिंग असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंट यांची उरदु भाषेची परीक्षा हायर स्र्यांडर्डप्रमाणें पास झाली.

म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेस गेलेली एथील मुलें ७ व उमरावतीचीं ९ अशीं सर्व इंग्लिश परिक्षेंत पास झालीं हें ऐकून आह्मांस संतोष होतो. व आह्मी उमेद बाळगतो कीं एकंदर सर्व परिक्षेंतही सालाबादपेक्षां या वर्षीं बरींच अधिक मुलें पास होतील.

मि० आर्देसर दिनसाजी अकोटचे तहशिलदार यांची फौजदारी दिवाणी व मुलकी कायद्या संबंधी हायर स्ट्यांडर्ड परीक्षा पास झाली. ( रेसिडेन्सी आर्डर तारीख २० नोवेंबर. )

हे तहशिलदार रजेवर गेले होते ते काल रोजीं येथें येऊन आपले कामावर गेले.

रा. रा. सखाराम दत्तात्रय जळगावचे तहशिलदार यांस नोवेंबर महिना अखेर पेनशनाविषयीं अर्ज करावा असा हुकूम होता त्या प्रमाणें त्यानीं मुदत भरल्याचा अर्ज, हुकूम होईल त्याप्रमाणें करूं असें मजकुराचा, केला आहे असें समजतें.

मि० हामिलटन साहेब येथील सेकंड ग्रेड एकझिक्युटिव इंजिनियर हे फर्स्ट ग्रेड झाले.

## सिंक्लेर मेमोयरिल फंड वसूल.

रु.

सा.रा. श्रीराम भिकाजी डि. इ. इ. अकोला २५

,, विष्णु मोरेश्वर महाजनी एम ए असि. मा. हा. अकोला २५

,, वामन बाळाजी ओझरकर हे. क्ला. डा. आ. अकोला २५

,, सुंदर दामोदर हेड मास्तर खामगाव २५

,, रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर बी. ए. असि. मा. हा. स्कू. २०

मि० नूरखान प्रिन्सिपाल ट्रेनिंग कालेज १५

,, त्रिंग्यांजा सेकंड क्लार्क डा० आ० अकोला १०

रा. कृष्णाजी सदाशिव तांबे हेड मास्तर मेहेकर ६

,, रामचंद्र त्रिंबक हेड मा. बोरगाव ५

,, वामन विनायक असि. खामगाव ५

,, चिंतामण गणेश असि. खामगाव ३

,, बाळकृष्ण रामचंद्र असि. खामगाव ३

,, चिंतो बाळकृष्ण हेड मा. जंळब ३

,, गणेश गोपाळ हेड मास्तर बारशीटाकळी ३

,, बाळकृष्ण पांडुरंग हे. मा. लैसपुर २

,, चिमणाजी सखाराम हे. मा. घुसर २

,, सखाराम हणमंत हेड मा. लैसांस २

,, शंकर भिकाजी हेड मास्तर जनुने २

,, सदाशिव पद्माकर हेड मास्तर मुलींची शाळा खामगाव २

,, विष्णु बाळकृष्ण हे. मा. पहुराजिरे २

,, शिवराम रामचंद्र हेडमास्तर हिंगणें कारेगाव २

,, शंकर त्रिविक्रम हे. मा. विहिगाव २

,, रामचंद्र गोपाळ हे. मा. जानोरी २

,, महादेव अनंत हेड मास्तर राहीत २

,, गणपत वेडू हेड मास्तर पळसो २

,, विष्णु वासुदेव हेडमास्तर झोडगें २

,, कृष्णाजी चिंतामण हेड. मा. आगर १॥

,, श्रीधर बाळकृष्ण अ. मा. खामगाव १॥

,, रंगनाथ बाबु देव हेड. मा. टाकळी-विरे १॥

,, बळवंत रामचंद्र हे. मा. जवळे १॥

,, विठ्ठल गणेश अ. मा. शेगाव १

,, खंडू गणेश अ. मा. शेगाव १

,, आत्माराम रामचंद्र अ. मा. जलंब १

,, सखाराम बाळाजी हे. मा. अंत्रज १

,, व्यंकटेश भास्कर हे. मा. पळशी १

,, आपाजी मल्हार अ. मा. बारशटाकळी १

,, हरि परशराम हे. मा. चिखलगाव १

,, नारायण त्रिंबक अ. मा. बोरगाव खुर्द १

रा. बाप रामचंद्र हे. मा. कोळंबी .॥

२१२८

## वर्तमानसार

नामदार लार्ड नार्थब्रूक हिंदुस्थानचे व्हाईसराय ९वे तारखेस कलकत्यास जाऊन दाखल झाले.

मि० सदाशिव विश्वनाथ धुरंधर एल एल बी यांनीं बारिस्टरचे कामाकरितां आपली परीक्षा ध्यावी ह्मणून हायकोर्टाचे चीफ जष्टिस यांस अर्ज केला होता त्यावरून त्यांनीं कमिटी नेमिली आहे व सोमवारीं परीक्षा सुरू झाली आहे.

यंदाच्या एम. एच्या परिक्षेंत चार उमेदवार पास झाले. पैकीं पुणें डेकन कालेजांतील दामोदर गणेश केळकर व श्रीधर गणेश जिनशीवाले व मुंबई येथील एलफिन्स्तन कालेजांतील गणपत सदाशिवराव व गोविंद वासुदेव टुलू हे आहेत.

यंदाच्या एल एल बीच्या परीक्षेंत उमेदवार पास झाले. पैकीं पुणे डेकन कालेजांतील दामोदर गणेश केळकर व श्रीधर गणेश जिनशीवाले व मुंबई येथील एलफिन्स्तन कालेजांतील गणपत सदाशीव व गोविंद वासुदेव टुलू हे आहेत.

प्रिन्स आफ वेल्स— मद्रासेहून १८वे तारखेस निघतील ते कलकत्त्यास २३ वे तारखेस जाऊन जानेवारीचे तिसरे तारखेपर्यंत तिकडेच रहातील त्या विषयीं विशेष पुढें कळेल. प्रस्तुत वायव्य प्रांतांतील त्यांचे फिरण्याविषयीं माहिती मिळाली आहे ती अशीः—

जानेवारीचे ४ थे तारखेस प्रिन्स बंकापुरास जातील तेथें ले. गवरनर साहेब यांस भेटतील, मग मागील दुष्काळाचे प्रसंगीं ज्या ज्या युरोपियन व नेटिव थोर लोकांनीं सहाय केलें त्यांच्या व राजपुत्राच्या भेटी ले० गवरनर करून देतील. मग उपहार झाल्यावर स्पेशियल गाडींतून काशीस जातील ते संध्याकाळीं तेथें पोंचतील. त्यावेळीं घाटावर व नदींत दीपोत्साह होईल. दुसरे दिवशीं लेव्ही होऊन काशीचे महाराज यांची भेट व परतभेट होईल. नंतर इस्पितळाचा पहिला दगड बसविण्याचा समारंभ प्रिन्स स्वहस्तें करितील. पुढें सहावे तारखेस ९ वाजतां लखनौस जातील व ४ दिवस तेथें रहातील. तेथें तालुकदार लोकांकडून केसर बागेंत एक मोठी मेजवानी होईल व छतर मंजील येथें बाल होईल. एक दिवस रान डुकराच्या शिकारी होतील. १०वे तारखेस निघून तिसरे प्रहरीं कानपुरास जातील. बंडाच्या प्रसंगीं क्रूररीतीनें मारिलेल्या युरोपियन लोकांच्या स्मरणार्थ तेथें बगीचा व भजनालय केलेंलें आहे तें पहाण्यास प्रिन्स स्वतः जातील. नंतर भोजनोत्तर निघतील व ते ११ वे तारखेस पहाटे दिल्लीस जातील ते १७ तारखेपर्यंत तेथें राहून १८वीस लाहूरास जातील. तेथून २० वीला जमूस जाऊन २२वीला पुन्हा लाहुरास येतील. पुढें २४ वेतारखेस लाहुराहून निघून २५वे तारखेस तिसरे प्रहरीं आग्र्यास येतील. तेथून हरिद्वार व रुरकी पहाण्याचा बेत होता तो रहित झाला. आग्र्यास ले. गवर्नरची पुन्हा भेट होईल. यमुना नदींतून बोटीच्या पुलावरून जातील. पुढें हत्तीवरून मिरवणूक, तोफखाना, घोडेस्वार यांसुद्धां थाटाची निघेल. व छावणींत जाईल. तेथें ले. गवर्नर यांकडे तारीख ३१ जानेवारींपर्यंत रहातील.

बहुत राजे लोकांच्या व संस्थानिकांच्या तेथें भेटी होणार आहेत त्याखालीं २ दिवस मोडतील. २६ वे तारखेस प्यालेस मध्यें गवर्नर साहेब एक मोठा समारंभ करतील व त्यास राजे रजवाड्यांसही बोलावतील. २७वे तारखेस - ताज महालावर व सर्व शहरांत दिव्याची रोशनाई होईल. २८वे तारखेस वायव्य प्रांतांतील सर्व सिविल व लष्करी खात्याचे लोकांकडून मोठा बाल होईल. २९ वे तारखेस बहुधा फत्तेपुर शिक्री पाहून येतील. ३१ वे तारखेस ग्वालेरीस जातील. तेथें शिंदे महाराजांची भेट होईल व फेब्रुवारीचे २ रे तारखेस आग्रा येथें परत येतील. तेथून तिसरे किंवा ४ थे तारखेस निघून जयपुराकडे जातील. अजमीर येथें जाणार होते पण आतां जात नाहींत. ६ वे तारखेस रात्रीं जयपुराहून निघून ७ वे तारखेस पाहटे मुरादाबादेस जातील. व. तेथून तेराईस जातील. तेथें ३ आठवडे वाघाच्या शिकारी होतील. जनरल रामसे व सर जंगबहादूर हे तेथें येऊन मिळतील. मग मार्च्याचे ४थे तारखेच्या सुमारास अमदाबादेस येतील व तेथून इंदुरास ६वीला सकाळीं येतील पुढें ७वीला सायंकाळीं तेथून निघून ८वीला नांदगावास येऊन एलूरची कोरीव लेणीं पहातील व ९वीला एलुराहून निघून १० विला मुंबईस जातील व मग जलमार्गानें विलायतेस परत जातील.

---

पारिस शहरांत भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारे लोकांची संख्या एकंदर६९२५० आहे. पैकीं १४,५०० पुरुष आहेत; २९,४८० बायका आहेत; १३,०६० मुली आहेत व १२,२१० मुलें आहेत. तेथें ज्यांच्या कुटुंबांत पुष्कळ मनुष्यें आहेत अशा कांहीं बायका आहेत त्या आपलीं तान्हीं मुलें दररोज कांहीं पैसा घेऊन भिक्षा मागण्याकरितां भाड्यानें देतात.

खानदेशांत मायजी येथें सन १८७६ सालीं फेब्रुवारीच्या २९ वे तारखेस कलाकौशल्याच्या प्रदर्शनास प्रारंभ होणार आहे.

डाक्टर आफ सिव्हिल ला ही पदवी युवराज प्रिन्स आफ वेल्स यांस कलकत्त्याची युनिव्हार्सिटी देणार आहे. यासाठीं चालू महिन्याच्या ३० व्या तारखेस कान्व्होकेशन भरून चान्सलर हे स्वतः ही पदवी देतील.

सरकारी कामगारांनीं वर्तमानपत्राशीं संबंध ठेवूं नये असा हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला आहे तो बंगाल गव्हरमेंट ह्मणतें कीं, आनररी माजिस्ट्रेटांस लागू नाहीं.

कलकत्ता युनिवर्सिटीच्या म्याट्रिक्युलेशन परिक्षेस २३७२ व फर्स्ट आर्टस परिक्षेस ५७५ उमेदवार आहेत असें कळतें. त्यांच्या परिक्षेस सोमवारीं आरंभ झाला.

रा. रा. वरदाचार्य राघवाचार्य, बी. ए. ( मद्रास युनिवार्सिटी ) नाशिक जिल्ह्यांतले फौजदार यांस मद्रास इलाख्यांत पोलिस इन्स्पेक्टर नेमलें आहे. असे शिकलेले हुशार लोक पोलिसांत नेमले तर प्रजेचें रक्षण चांगलें होईल.

कलकत्त्याचे डायेरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मि० अटकिन्सन यांनीं ५५ वर्षांच्या नियमाअन्वयें नुक्तीच चाकरी सोडिली होती. पण त्यास आणखी तीन वर्षें चाकरी करण्याची सरकारानें परवानगी दिली.

इं. प्र.

---

## जाहिरात.

## सन १८७६ सालाकरितां रोजनिसी.

पूर्वीं जाहिरात दिल्या प्रमाणें सर्द रोजनिसी छापून विक्रीस तयार आहे. ज्यास घेणें असेल त्यानें किंमती बद्दल ८६ आणे व टपाल खर्चाबद्दल एक आणा मिळून ८७ आणे आह्माकडे पाठविले असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल. यांत सरसालचे दिनचर्येसंबंधी तारखा, महिने, तिथी सूर्योदय, सूर्यास्त; [illegible]री अफिसांस असणाऱ्या सुट्या [illegible] विवाहाचे मुहूर्त, मुसलमान लोकांचे सण यांची माहिती दिली आहे. खेरीज रेलवे, स्टांप तारायंत्र, मनिआर्डर, पोस्ट, इत्यादि अनेक नेहमीं जरूर लागणारे उपयुक्त विषयांची माहिती दिली आहे.

भाऊ गोविंद सापकर.

ज्ञानचक्षूचे मालक.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस.

REDUCTION OF RATE FOR WINES AND SPIRITS IN BOTTLES, AND RULES FOR CHARGING FRACTION OF ANNAS.

**बाटल्यांमध्यें भरलेल्या दारू व अर्कावरील दर कमी करण्याबद्दल आणि एका आण्यापेक्षां कमी भाड्याचे भाग कसे घ्यावे याविषयीं नेमाबद्दल**

**सूचना.**

**दारू व अर्क**— एतद्वारें सूचना देण्यांत येतें कीं चालू महिन्याचे अखेरीपासून बाटल्यांत भरलेल्या दारू व अर्कावरील दर, ते पदार्थ साधारण मालाच्या मालिकेंत ४ थ्या वर्गांत आहेत ते ३ ऱ्या वर्गांत घालून कमी केले जातील.

मुंबई व भायखळा आणि पुणें व खडकी यांच्या दरम्यान जाणाऱ्या येणाऱ्या बाटलींत भरलेल्या दारूवर व अर्कावर दर मणामागें १२ आण्याप्रमाणें जो खासगी दर आहे तो तसाच राहील आणि या पदार्थांकरितां जे दुसरे खासगी दर आहेत ते सर्व रद्द बातल केले जातील.

एका आण्याचे अपूर्ण भाग— चालू महिन्याच्या अखेरीस प्रत्येक टिकिटीकरितां व तसेंच माल आणि पार्सलें व दुसऱ्या वस्तु याच्या भाड्यांबद्दलच्या दरांत एका आण्यापेक्षां कमी भाग आले असतां ते घेण्याविषयींचे खालीं लिहिलेले नियम चालू होतील.

एकंदर भाड्याची रकम जेव्हां चार आण्याच्या वर असते तेव्हां आण्याचा अपूर्ण भाग जर ६ पैपेक्षां कमी असला तर तो मुळींच सोडला जाईल. आणि ६ पै किंवा जास्त असला तर त्याबद्दल एक आणा घेतला जाईल. एकंदर भाडें घेण्याचें तें जर चार आण्यांपेक्षां कमी असलें तर प्रत्येक वेळीं पाव आणा कमीजास्त घेतला जाईल. उदाहरणार्थ जर एखाद्या टिकिटीचा दर अथवा मालाचें भाडें खरोखर ५ रुपये २ आणे ६ पै होत आहे तर त्याबद्दल ५ रु. ३ आ. घेतले जातील. किंवा असें समजा कीं भाडे ९ रु. ४ आ. व ८ पै आहे तर त्याजबद्दल ९ रु. ५ आ. घेतले जातील. परंतु जर टिकिटीचा दर अथवा मालभाडें १२ रु. ७ आ. ५ पै आहे तर त्याजबद्दल १२ रु. ७ आ. मात्र घेतले जातील. तसेंच टिकिटीचा दर जर खरोखर ३ आ. व ४ पै होत असला तर त्याजबद्दल ३ आणे व ६ पै. घेतले जातील. उतारूचा टिकिटीचा दर कमींत कमी ६ पै. आहे व माल आणि पार्सलें यांचा कमींत कमी दर पूर्वीं जाहीर केल्याप्रमाणेंच राहील.

हेनरीकांडर.

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० ९ माहे नोवेंबर

सन १८७५ इसवी.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनूसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस

REOPENING OF THE KHAMGAON STATE RAILWAY.

## खामगाव स्टेट रेलवेची पुन्हा सुरुवात.

डिसेंबर महिन्याची तारीख १० रोज शुक्रवार या दिवशीं व त्यापुढें खामगाव स्टेट रेलवे उतारू व माल याकरितां पुन्हां पूर्वीप्रमाणें चालू केली जाईल; व या दिवसापासून पुढें दुसरी नोटिस लागेपर्यंत नागपुर डाऊन ट्रेन (मुंबईकडे जाणारी गाडी ) च्या संबधानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान खालीं लिहिलेल्या वेळावर एक मिक्सड ट्रेन (उतारू व माल मिळून ) दर रोज जात येत जाईल.

**खालून जाणारी गाडी ( डाऊनट्रेन. )**

जलमहून निघेल सकाळीं १०अवर१५मि

खामगावाला पोंचेल ,, ११ वाजतां.

**वरून जाणारी गाडी ( अपट्रेन )**

खामगावाहून निघेल रात्रीं १०अवर४०मि

जलमला पोंचेल ,, ९ ,, ३०मि.

खामगावाहून या रेलवेच्या किंवा कोणत्याही स्टेशनाला थेट उतारू, माल व पार्सलें (बिनड्या) घेतल्या जातील. व तिकडून खामगावाला थेट आणिल्या जातील.

खामगाव येथें कापूस व इतर माल या कंपनीनें गोळा करण्याचें व बरोबर पोंचवून देण्याचें काम सोडून दिलें आहे. यासाठीं यापुढें लोकांनीं आपआपला माल व कापूस स्टेशनावर आणून पोंचविण्याची व तेथून घेऊन जाण्याची तजवीज केली पाहिजे. कार्टिंग ह्मणजे माल घरून स्टेशनावर आणणें व स्टेशनावरून घरीं पोंचविणें याबद्दल जो एक्स्ट्रा च्यार्ज्य ह्मणजे शिवाय खर्च लागत होता तो यापुढें घेतला जाणार नाहीं. त्याशिवाय जो दर घेण्याचा शिरस्ता आहे त्याप्रमाणें सर्व प्रसंगीं आकार घेण्यांत येईल.

दरदाम वगैरे विषयीं माहिती स्टेशनावर किंवा या नोटिशीखालीं सही करणाराकडे मिळेल.

हेनरी कांडर,

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० ८ माहे नवेंबर

सन १८७५ इसवी.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा.

REGISTERED NO. 5 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० १९ माहे डिसेंबर सन १८७५ इ० अंक ५१

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |


## जाहिराती.

### मल्हाररावाचें नाटक.

या नावाचीं मनोरंजक पुस्तकें वऱ्हाड समाचार छापखान्यांत विक्रीस आलीं आहेत. किंमत दर प्रतीस एक रुपया दोन आणे. बाहेर गावीं मागविणारास टपाल हशीलाबद्दल दोन आणे शिवाय लागतील.

### प्रेमबंधन,

या नावाची सुरस व मनोरंजक उत्तम कादंबरी नुकतीच छापून तयार झालेली वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीकरितां आली आहे. किंमत दीड रुपया. बाहेर गावचे घेणारास डाक हशील तीन आणे शिवाय पडेल.


## पत्राच्या शिलकी बाक्यांवर व्याज द्यावें लागेल.

आमच्या कित्येक वर्गणीदारांकडे दोन दोन व तीन तीन वर्षांच्या बाक्या येणें राहिल्या आहेत त्या त्यांनीं आतां खानगी रीतीनें लवकर पाठविल्यास आह्मांवर त्यांची मोठी मेहेरबानी होईल व त्यांची आणि आमची दगदग चुकेल. आणि अशी त्यांनीं कृपा न केल्यास निरुपायामुळें त्या बाक्या कायदेशीर रीतीनें वसूल करणें आह्मास भाग होईल; आणि तसेंच करावें लागेल तेव्हां प्रत्येक सालची बाकी घेण्यास योग्य झाल्या दिवसापासून तिचें व्याज दरमहा दर शेकडा दोन रुपये प्रमाणें जें आकारेल तें तिजवर चढवून वसूल करण्याची तजवीज केली जाईल हें सर्वांस अगाऊ कळविण्यांत येत आहे.

तसेंच साल दरसाल बाक्या मागण्याकरितां इकडून वेळोवेळां पत्रें लिहिलीं आहेत व पुढें लिहिलीं जातील त्यांचा टपालखर्च व मुद्दाम मनुष्य पाठवावे लागल्यास त्यांचा खर्चही त्या त्या कुळांवर आकारला जाईल हेंही सर्वांस कळावें. तारीख ७ माहे नोवेंबर सन १८७५ इ०

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नोटिसा.

दुली मर्द ह्मसाजी माहोरे रहाणार अणवी नजीक मिरजापुर तालुके अकोले इजला ह्मसाजी वल्लद गंभिरजी माहोरे रहाणार चांदूर तालुके अकोले याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी लग्नाची बायको आहेस तुझ्याशी माझें लग्न झाल्यास सुमार १० वर्षे झालीं तेव्हांपासून तूं माझें घरीं नांदत होतीस अलीकडे सुमार दीड वर्ष झालें तूं माहेरीं गेलीस ती परत आली नाहीं. दोन तीन वेळां मी तुला आणण्यास आलों असतां तूं आली नाहींस त्यावरून तुला कळवितो कीं ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांचे आंत तूं माझे घरीं यावें न आलीस तर ताब्यांत घेण्याविषयीं तुजवर दावा करीन. आणखी मी असें ऐकलें आहे कीं तुझा बेत गंधर्वाचा दुसरा नवरा करावा अता अहे व तूं तसें लवकरच करणार आहेस यावरून तूं गंधर्व करशील किंवा गंधर्व करण्यास आपणास मोकळीक मिळावी ह्मणून खोटी फारकत वगैरे करशील तर तुजवर फौजदारींत फिर्याद करीन मग तुला कैदेची सजा होईल. माझें ऐकण्यांत असेंही आलें आहे कीं एक रुपयाच्या स्टांपावर एक खोटी फारकत बनविण्याची खटपट तूं केली आहेस असें करणें फार खोटें काम आहे याजबद्दल तुला शिक्षा होईल तर कोणाचे नादीं न लागतां तूं नोटिस पोचतांच माझे घरीं येऊन संसार करावा. या नोटिशीचा खर्च तुला द्यावा लागेल तारीख १४ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

[ सही ] ह्मसाजी [illegible]द गंभिरजी
माहोरे रहाणार चांदूर
तालुके अकोले निशाणी खुद्द.

### नोटिस.

नारायण अमृतराव देशपांडे रहाणार अकोले यांस नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे मी पाणी भरलें त्याबद्दल १५ रुपये बाकी येणें आहे व १० रुपये रोख घेतलेत आणि जनानी साधेकाठी घडी मोडलेला एक पितांबर मजपाशीं गहाण ह्मणून ठेविला व एक महिन्यांत रुपये देतो ह्मणालात त्याप्रमाणें १५ महिने झाले अजून दिले नाहींत मी बहुत वेळा मागितले. व आतां ८।४ दिवसांत देशीं जाण्याचा माझा बेत आहे याजकरितां नोटिस दिली आहे ही पोचल्यावर २ दिवसांत माझे रुपये व्याजासुद्धां द्यावे व पितांबर घेऊन जावा असें न कराल तर चौघासमक्ष तुमचा पितांबर लिलाव करून विकला जाईल व रकम येईल ती तुमचे कर्जांत जमा धरून बाकीबद्दल फिर्याद करून खर्चासुद्धां रकम भरून घेईन कळावे तारीख २१ डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) गुलाबराम गुजराथी
निशाणी कावड

### नोटिस.

राजश्री लक्ष्मणजी भटकर रहाणार मौजे रंभापुर तालुके मूर्तिजापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मौजे रंभापुर येथील सर्वे नंबर १३, १४, व ४२ यांचीं खातीं आमचे नावें असून आमच्या ते पूर्ण मालकीचे अहेत. ते आम्ही वामनराव गोविंद जमादार दुकान पेठ मूर्तिजापुर याहास फरोक्त केले आहेत. व हल्लीं सालच्या पिकासुद्धां त्याहाच्या कबज्यात दिले आहेत. तर तिन्ही नंबरांचा साल मजकूरचा वायदा जमादार साहेबांपासून घ्यावा व ते देतील. व सनमजकूरचा माल तिन्ही नंबरांतला त्याहास नेण्यास कोणते तऱ्हेनें आपण हरकत करूं नये. जर कदाचित आपण हरकत कराल तर पिकाच्या नुकसानीबद्दल ८०० रुपये आपणास भरून द्यावे लागतील. आम्ही कोणत्याही गोष्टीबद्दल जबाबदार होणार नाहीं सबब तुह्मास लेखी नोटिशीनें कळविले अहे- कळावें. तारीख २३ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) शिवजी वल्लद मकरमजी
सरोदे व बदराजी
वल्लद चंड माळी
निशाणी खुद्द.

### नोटिस.

राजश्री मनसाराम गणकराय साहू दुकान कसबे शिरसव तालुके मूर्तिजापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं जमीन तुमचे कबज्यांत देऊन तुह्मास गहाण लावून दिली परंतु त्या तारखेपासून आजपर्यंतचा जो शेतांतील माल झाला तो हिशोब करून आमची जमीन परत दिली नाहीं करितां तुह्मास लेखी नोटिशीनें कळविलें जातें कीं ज्या तारखेपासून दस्तैवज करून घेतला त्या दिवसापासून शेतांतील मालाचा हिशेब करून आमचीं शेतें व रजिस्टर दस्तैवज व फाजल जें निघेल तें परत द्यावें व पावती घ्यावी असें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें तारीख ११ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) सोनाजी वल्लद
पिरथमजी चाभार
दस्तुर खुद्द.

### नोटिस

रा. लक्ष्मणजी भटकर रहाणार मौजे रंभापूर परगणें मूर्तिजापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं मौजे रंभापुर तालुके मूर्तिजापूर येथील सर्वे नंबर १३।१४।४२ हे आह्मी शिवाजी सरोदे व बदराजी वल्लद चंड माळी राऊत जामठीकर याजपासून सन मजकुरचे पिकाशुद्धां अंली खरेदी घेतले आहेत तर आपण सन मजकुरचा वायदा तिन्ही नंबरांचा आपण आमचे पासून घ्यावा. आह्मी देऊ तारीख ११ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) वामनराव गोविंद जमादार दस्तुर रामचंद्र
सखाराम कुलमुखत्यार.

### नोटिस.

अजी मर्द कृष्णाजी पाटील रहाणार ताजनापुर तालुके अकोट इजला नामाजी वल्लद माधोजी पाटील रहाणार मनचनपुर तालुके अकोट याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो तो असा:—

तारीख ७ नोव्हेंबरच्या वऱ्हाडसमाचार पत्रांत तूं नोटिस दिली ती खोटी आहे. ४०० रुपयांचा पुर्जा आमचे पाशीं नाहीं. प्रथम तूं रुपये मागितलेस तेव्हां मनचनपुर मुक्कामीं तुला रोख रुपये चौघे साक्षीदारांसमक्ष दिले. व अकोल्यास आल्यावर तूं स्वसंतोषानें पुर्जा लिहून दिला. त्यास आतां असें बेमान होणें ही तुझ्या लायकीची गोष्ट अहे. अस्तु. रकम तुला पोंचली अहे. व पुर्ज्याबद्दल तूं बेमानी केली आहेस. ती अशी कीं, तुला पाहुणे पहाण्यास येणार होते व मला जरूरीकरितां अडगावास जावयाचें होतें ह्मणून राघो शेळके याजपाशीं तुझे पहिल्या नवऱ्याचा राजीनामा व हा पुर्जा मी देऊन ठेविला होता व तूं माझे घरांत होतीस ह्मणून ही गोष्ट तुला माहित होती. मी परत येतांच राघो जवळचे कागद आणून घ्यावयास विसरलो. पुढें तूं एक दिवस राघोकडे जाऊन माझा खोटा निरोप सांगून व त्याला भरवसा देऊन दगाबाजीनें त्याजपासून हा पुर्जा व राजीनामा दोन्ही कागद मागून आणून घेतलेस. व तेव्हांपासून तो पुर्जा तुझेजवळच असून लबाडीनें मला नोटिस देतेस परंतु अशानें माझे रुपये बुडणार नाहींत. तुझी लबाडी सरकार ध्यानीं येईल व तुला नशियद होईल. हल्लीं तुला कळवितों कीं माझे रुपये तुजकडे येणें खरें अहित व ते ८ दिवसांत पाठऊन द्यावे. नाहीं तर फिर्याद करून भरून घेतले जातील. पुरजा आह्मापाशीं नाहीं. कळावें. तारीख १२ डिसेंबर १८७५इ.

ताजाकलम—माझ्या चार शें रुपयांचा देवाल होईल तो इजला गंधर्वानें करील असें जो कोणी तुला पहावयाला येई त्याजला मी सांगत असे. याजवरून

कृष्णाजी पाटील पक्षण्वास आला व रुपये कबूल होऊन सोयरीक केली. व पाट लाबते वेंळेसही ताकीद दिली. नंतर कृष्णानें पाट लाविला यासाठीं कृष्णाजी यांशा जबाबदार आहे. तारीख १९ माहे डिसेंबर सन १८७९ इसवी.

[ सही ] नामाजी वल्लद याधोजी पाटील मौजे मनबमपुर दस्तुर खुद.

---

### नोटिस.

अजी मर्द गणु गाडगे रहाणार मौजे औळखेडें तालुके अकोट इजला खालीं सही करणार गणू वल्लद देवाजी गाडगे रहाणार मौजे तरोडें तालुके अकोट याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो तो खालीं लिहिल्याप्रमाणें: —

तूं तारीख २८ माहे नोवेंबर सन मजकूरचे वऱ्हाडसमाचार पत्रांतून नोटिस दिली कीं, लग्न लागते वेळीं मी बारमाशा आहे असें सांगितलें व आतां समजतें कीं अकरमाशा अहिस ह्मणून फारखत द्यावी. पण ही तुझ्या अकलेची गोष्ट नाहीं तर तुला फितूर देणारे दुसरेच लोक आहेत. व त्यांचे नादीं लागून तू खोटी नोटिस दिलीस. लग्न होऊन आज सुमार १४ वर्षे झालीं व त्या वेळेस तुझ्या बापानें चांगला शोध करूनच सोयरीक केली व तेंव्हांपासून तूं आमचे घरीं नांदत होतीस पण तूं सहज ह्मणून माहेरीं गेलीस त्यास सुमार दोन वर्षे झालीं. तेंव्हांपासून तूं येत नाहींस व हल्लीं दुसऱ्याचें नादीं लागून ह्मणतेस कीं; साक्षी पुरावा देऊन आमची खात्री करून द्यावी तर आम्ही बारमाशी आहोंच. आतां तूं विनाकारण नोटिस दिलीस तर तूंच आसपासचे पांच गावचा पुरावा घेऊन ये. आम्ही ज्या गावांत रहातों त्यांपकीं पांच चार असामींनीं अकसानें हा फंद केला आहे. ह्मणून तेवढ्यावरच हा पुरावा होतो असें नाहीं. तर या गोष्टीस पांच चार गांवचा पुरावा पाहिजे तो घेऊन ये कारण तूं मला अकरमाशा ह्मणतेस तेंव्हां सर्व पुरावा तुला केला पाहिजे. तर हा नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचें आंत पुरावा कर नाहीं तर तुला कायद्याप्रमाणें ताबेत घेण्याविषयीं मी सरकारांत फिर्याद करीन त्याचा व या नोटिशीचा खर्चसुध्दां तुला द्यावा लागेल व फारखत कधीं मिळणार नाहीं हें खूप समजावें. कळावें. तारीख १८ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

( सही) गणू वल्लद देवाजी. गाडगे वस्ती तरोडें नजीक कावसें निशाणी खुद.

---

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य ७ शके १७९७.

## महा रोगग्रस्तास आश्रय.

दुसऱ्यावर उपकार करणें या सारखा दुनियेंत दुसरा धर्म नाहीं. त्यांतहीं इतर वस्तु दानापेक्षां शरिरास आरोग्य करणारें दान फार प्रशस्त आहे ह्मणून वैद्यकीच्या धंद्याची ऐहिक व पारलौकिक साधन संबंधानें मोठी योग्यता मानिलेली आहे. साधारण रोग्यापेक्षां महारोगानें ग्रासलेले व ज्यास आपले जीविताचीही आशा नाहीं त्यास सुस्थिती देणें या सारखा परोपकार कोणताच नाहीं ह्मटलें असतां चालेल. रक्तपीति हा रोग महारोगांतला आहे व यानें ज्याला झपाटलें त्यांच्या दुनियेंतील सर्व सुखाची समाप्तिच झाली असें समजतात. पण त्यावरही रामबाण औषध आमचे महान् परोपकारी कैलासवासी डा० भाऊ दाजी यांनीं काढिलें होतें व बहुत रोग्यांस त्यांनीं निरोगी केलें त्यांचे मागें त्यांचे बंधु तो उपच्यार करीत होते त्यांस ही आमच्या देशाच्या दुर्दैवानें जिवंत ठेविलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे, अस्तु. हल्लीं मुंबईंत रक्तपीतीनें ग्रस्त असलेल्या लोकांवर दया करण्याची गोष्ट निघाली आहे व तिजविषयीं सभा भरून त्याकरितां एक मोठें आस्पिटल बांधावें असा विच्यार ठरला आहे. कित्येक उदार लोकांनीं पांच पांच हजार रुपये देण्याचें कबूल केलें आहे. कोणी इमारतीस जागा देताहेत, दगड वगैरे सर्व सामान देताहेत यावरून मुंबईकरांचा सर्व बेत यथास्थित सफल होईल असें दिसतें. व तसें झाल्यानें सर्व ठिकाणच्या रोगानें पीडित असलेल्या लोकांस तेथें जाऊन उपच्यार करून घेण्यास सोय होईल व तेणेंकरून हजारों महानरोगी दुःखविमुक्त होऊन उपकारकांस यावज्जन्म स्मरतील यांत संशय नाहीं.

या गोष्टीची जशी जशी सुरुवात होईल तसें तसें तें वृत्त आम्ही आपले वाचकांस कळवूं.

---

## मनमाड व धोंड रेलवे.

कलकत्ता व मद्रास या दरम्यान किंवा दक्षिण हिंदुस्थानांतून उत्तर हिंदुस्थानांत व उत्तर हिंदुस्थानांतून दक्षिण हिंदुस्थानांत रेलवे मार्गानें जाणारास बोरघाट व तळघाट चढून उतरून पश्चिमेस कल्याणापर्यंत जावयाचे विनाकारण श्रम पडतात, खर्च अधिक लागतो, व बहुत प्रसंगीं घाटांत हरकत होऊन त्यांचें जाण्या येण्यास प्रतिबंध होतो. तो टाळावा ह्मणून भुसावल आणि नाशिक लाइनवरील स्टेशन मनमाड व पुणें आणि सोलापुर लाइनवरील स्टेशन धोंड यांच्या दरम्यान अहमदनगरावरून रेलवे नेऊन दोन लायनींचा सांधा जोडून दक्षिणोत्तर थेट व्या उताऱ्यास घाटाकडे वळण्याचें टाळावें असा विच्यार बहुत दिवसांपासून निघून मागें पडला होता परंतु पुन्हा त्याची वाटाघाट सुरू झाली आहे व त्याप्रमाणें घडेल असें वाटतें. हिंदुस्थान सरकारानें मनमाड व धोंड रेलवे न करितां नाशकाहून पुण्यास रेलवे होईल तर पहावें असा विच्यार काढला आहे व दोहोंचेंही अंदाज झाले आहेत त्यावरून पहातां मनमाड व धोंड हा रस्ता अधिक सोयकर व कमी खर्चाचा आहे असें दिसतें. सबब हिंदुस्थान सरकार हा कबूल करून लवकर तो तयार करण्याची परमानगी देईल अशी आम्ही आशा करितों. व तसें झाल्यानें देशास मोठें सौख्य होईल.

---

## हिंदुस्थानांतील कलाकौशल्य.

( Communicated. )

आमच्या या अंकांत वाचकांस भरतखंडांतील प्राचीन व अर्वाचीन कलाकौशल्याविषयीं माहिती देऊन पुढें प्राचीन कलांचा ऱ्हास कसा होत गेला व त्यांचें आतां पुनरुज्जीवन करण्यास काय उपाय केले पाहिजेत तेंही थोडक्यांत सांगावें असा उद्देश आहे.

प्रथम कला ह्मणजे काय. आणि कौशल्य ह्मणजे काय याविषयीं क्षणभर विचार करूं.

कला शब्द हा केवळ संज्ञा वाचक आहे. वाद्य. नृय, गीत, वक्तृत्व; राज्यनीति, या सर्व कला होत. आतां या कलांपैकीं प्रत्येक कलेंत जें विशेष चातुर्य दृष्टीस पडतें, त्याला कौशल्य ह्मणावयाचें. उदाहरणार्थ वक्तृत्व ही कला खरी; परंतु वक्त्यानें श्रोत्यांचें मन मोहिलें जाईल अशा प्रकारचें जें सरस भाषण करणें त्याला वक्त्याचें कौशल्य असें ह्मणावयाचें. तसेंच राज्य करणें ही कला होय तथापि प्रजेस पीडा न होतां ती सर्व खुशी राहून आपलें चिरकाल कल्याण चिंतील असें करण्यास राजानें योजिलेल्या सदुपायांमध्यें जें त्याचें चातुर्य व शहाणपण दृष्टीस पडतें त्याला कौशल्य ह्मणावयाचें. यावरून कोणती ही कला ज्याच्या योगानें लवकर साध्य होऊन मनुष्य मात्राच्या विशेष उपयोगी पडतें त्याला कौशल्य असें नाव ठेविल्यास चालेलसें आह्मास वाटतें. आह्मीं या कलांचा फार प्राचीन कालाविषयीं विचार केला आहे, व त्यावरून आह्मांस असें समजलें आहे कीं ज्या अनंत कला आतां लोकास अवगत नाहींत किंबहुना ज्याच्या अस्तित्वाविषयींही लोकांस संशय पडतो अशा लक्षावधि कला सूर्यवंशी राम राजा या भरत खंडांत राज्य करीत असतां ऐन भरभराटींत होत्या; त्याहूनही पुढच्या कालाचा विचार केला तरी असें अनुमान करतां येतें कीं कौरव पांडवाच्या वेळीं या कला तशाच भरभराटींत होत्या. अंगदानें रावणाच्या सभेंत केलेलें संभाषण, उद्धवानें गोपींचें शांतवन करण्यासाठीं केलेलें प्रेमभरित भाषण, दुःखिताच्या व्यथेला भूल पाडणारें बृहन्नडेचें गायन व नृत्य, कंक भटाची व शकुनि मामाची द्यूत प्रवीणता, द्रोण, कर्णादिकांचे हस्त लाघव, ज्याविषयीं पुराणद्वारें आपणास चांगलें ज्ञान करून घेतां येतें, तीं ही कलांच्या प्राचीन सुस्थितीस साक्षी आहेत. संस्कृत भाषेत या कलांविषयीं कित्येक ग्रंथ आहेत, परंतु संस्कृत भाषा जाणणारे आतां लोक फार थोडे आहेत, व ज्या थोड्यांस त्या भाषेचें ज्ञान आहे त्यांस कलांचें पुनरुज्जीवन करण्यास अन्य साधनें अनुकूल नाहींत यामुळें त्यांना तें ज्ञान असून नसल्यासारखेंच झालें आहे. मराठीं विषयीं तर विचार करायालाच नको. साठ वर्षांच्या पूर्वींचे जर कागद काढून पाहिले तर त्यांत एक कपटा देखील असा सांपडणार नाहीं कीं ज्यावर नाचावें कसें, बोलावें असें, मापावें कसें, या विषयांवर दोन अक्षरें लिहिलीं आहेत. अस्तु याचा विचार पुढें करूं. संस्कृत ग्रंथावरून चौसष्ट कलांची नांवें लिहितां आलीं असतीं परंतु त्यांपैकीं कित्येक लोकांनीं ऐकलेल्या देखील नाहींत या करितां सर्वच सांगत बसून आमच्या पत्रांतील जागा व वाचकांबद्दल अमोल्य वेळ घेणें नीट न दिसल्यावरून त्यांपैकीं मुख्यमुख्य खालीं सांगितलेल्या आहेत त्या येणें प्रमाणें:—१ नाट्य, २ वाद्य, ३ नृय, ४ गीत ५ आलेख्य [ चितान्यांचें काम ] ६ मणि भूमिकाकर्म ( जमीनींत रत्नें बसविणें ) ७ उदक वाद्य ( जल तरंगादि वाजविणें ) ८ नेपथ्ययोग [ सोंगें सजाविणें ] ९ सूचीवान कर्म [ शिवण कला ] १० प्रतिमाला [ अंतीय काम करणें ] ११ पट्टिका विकल्प ( पट्टा खेळणें ) १२ तक्षण ( सुतार काम ) १३ वास्तु [ गौंडी काम ] १४ रौप्य रत्न परीक्षा १५ आकर ज्ञान ( अमुक ठिकाणीं अमुक वस्तु सांपडेल इत्यादि जें ज्ञान तें ) १६ ऐंद्रजाल ( गारुड ) १७ शुक सारिका प्रलापन ( पक्ष्यास बोलावयाला शिकविणें ) १८ वस्त्र गोपन ( कपडा विणणें) १९ द्यूत विशेष २० वैतालिक विद्या ज्ञान ( वीर मंत्र ज्ञान ) इ. इ.

आतां या पैकीं प्रथम वस्त्र गोपनावर थोडेसें लिहावें असा आमचा हेतु आहे. मनुष्याला वस्त्राची अवश्यकता फार आहे; कितीही गरीब असला तरी त्याला पोटाला भाकर आणि नेसायाला धोतर हीं पाहिजेत. आतां देशांतील लोक खर्च्या मानानें थोड्या किमतींत चांगलीं टिकाऊ अशीं वस्त्रें जेणेंकरून मिळतील ती गोष्ट आपणास केली पाहिजे. आतां कोणी असा प्रश्न करील कीं आमच्या देशांत माग आहेत, कुशल लोक आहेत, असें असतां आह्मांस दुसऱ्या देशाहून कपडा आणण्याची काय गरज ? आणि खरेंच हिंदुस्थानांमध्यें यांत्रिक विद्या जशी पसरावी तशी अजून जरी पसरली नाहीं. इंग्लंडांतील एका ब्रिस्टलमध्ये जितके सुताचे माग आहेत तितके सर्व हिंदुस्थानांत जरी नाहींत तथापि आपल्या आर्य जननीच्या पोटीं असे कित्येक पुत्र होऊन गेले आहेत, व हातील कीं त्यांहीं परिश्रमानें हस्तानीं विणलेल्या, यंत्रावरच्या कपड्याच्या तोंडांत मारणाऱ्या शालजोड्या आणि मंदील, प्रिन्स आफ वेलस, निजाम साहेब, शिंदे, होळकरादि वड्या वड्या लोकांनीं माना डोलऊन अति प्रेमानें वापरण्यास

योग्य असे तयार होतात. काश्मीरच्या शालजोड्या, येवल्याचे पीतांबर, पैठणचीं पागोटीं, काशीचे कद, नागपुरचे धोतरजोडे, इत्यादि खचित अद्यापही स्तुतिपात्र आहेत आणि अशा प्रकारचीं नामांकित कसबी शहरें आपल्या देशांत आहेत ह्मणून आपणास थोडा गर्व असण्यासही जागा आहे पण हा वर वर विच्यार झाला. थोडा बारीक विच्यार केला ह्मणजे या गर्वाचें आणि या भ्रमाचें तेव्हांच निरसन होईल. हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या किती आहे. ? अठरा कोटि. बरें निस्पंदील आणि शालजोड्या वापरणार बडे लोक किती निघतील ? सुमार एक लक्ष. बरें आतां बाकी राहिलेल्या सतरा कोटि नव्याण्णव लक्ष प्रजेस वस्त्रें कोण नेसविणार? अर्थात मांचिस्टर. श्रीकृष्णानें द्रौपदीस वस्त्रें नेसविलीं, त्याप्रमाणें मांचिस्टर हिंदुस्थानांतील अठरा कोटीस वस्त्रें नेसवितें आहे. द्रौपदीला धांवा करावा लागला, व तेवढ्यानेंच कृष्ण दयार्द्र होऊन त्यानें वस्त्रदान केलें. परंतु आमची लाज झांकणार आमची मांचिस्टर आमचें शतपट वित्त हरण करितें तेव्हां आह्माला वस्त्रें पुरवितें. एक दिवस जर मांचिस्टरानें हात अखडून धरला तर आमची काय दशा होईल ? काय ही आपली पराधीनता !!! आर्यजननीच्या उदरीं येऊन नेसायच्या वस्त्राकरितां लोकाच्या तोंडाकडे आम्ही पहावें काय? आमचें नशीबच तसें. पश्चिमेकडच्या लोकांनीं आह्मा पूर्वेकडच्या लोकांस सूर्योदय झाला असें सांगून जागृत करावें, आणि आमचा आज दुर्दैवाचा दिवस आला आहे. आह्मामध्यें ज्यांस थोडें लिहितां वाचतां येत आहे त्यांनीं परस्परांशीं तंटे करण्यांत किंवा कांहीं ग्रंथ वाचून आपल्याशींच मिटक्या मारण्यांत आपला काळ घालवावा अशी सध्यां देशाची स्थिति आहे. थोडें बहुत जे कोठें कोठें कारागीर आहेत त्यांस राजाश्रय नसल्या कारणानें ते आहे त्यांतच संतोष मानून सुधारणा करण्याची कल्पनासुद्धां मनांत न येऊं देतां आपलीं आयुष्यें घालवीत आहेत. कांहीं समंजस लोक, हुशार खरे, परंतु द्रव्याच्या आभावामुळें आपापल्या ठिकाणीं चुरमुरे खात बसले आहेत. द्रव्यवान ह्मणविणारे बडे लोक बड्या बड्यांना नजराणे व मेजवान्या देण्यांत आणि त्यांचा मान मरातब राखण्यांत दंग असणार. आणि खरेंच तें, ते तसें न करतील तर त्यांचे देव देव्हाऱ्यांत कसे रहातील ? अशा लोकांना आपल्या राज्यांत यंत्रें आणून कारखाने सुरूं करणें व एन्जिनियरिंग स्कुलें स्थापणें इत्यादि लोकोपयोगी कामें त्यांच्या स्वप्नांतही येत नाहींत ते आपल्याच ऐष आरमांत चैनींत, हत्ती घोड्यावर सोन्या रुप्याचे दागिने घालण्यांत किंवा भली चंगाळीचीं ब्राह्मण भोजनें करण्यांत दंग असतात. असें असल्यामुळें सध्यां हिंदुस्थानची स्थिति बरी करणारा तशांत कोणी दिसत नाहीं, व त्यामुळें ती दिवसे दिवस निकृष्टावस्थेप्रत जात चालली आहे.

( पुढें चालूं )

## वऱ्हाड.

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर शुक्रवारीं खामगावावरून शिगावास गेले व तिकडून अकोट तालुक्यांतून इलिचपुर जिल्ह्यांतून परत जाणार असें समजलें आहे.

क्या० हडलस्टन साहेब बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर तेथेंच आहेत ९ वे तारखेच्या सुमारास मेहकरास जमाबंदी करितां जाणार आहेत.

राव साहेब नारायण भाई डायरेक्टर वाशिमास आहेत.

खामगावास वादी रामचरण बुवा व प्रतिवादी मेसर्स राली आणि ब्रदर्स यांचा मुकदमा २२ वे तारखेस चालणार आहे. वादी यास मोगलाईपसून कापसाचे बोजावर श्री बालाजी निमित्त एक आणा मिळत जावा असा हक्क आहे तो ही कंपनी देत नाहीं ह्मणून वादीनें दावा केलेला आहे प्रतिवादीची तक्रार आहे कीं ही धर्माची बाब आहे सबब अमुकच द्यावें असा जबरदस्तीचा हक्क नसावा. उभय पक्षाकडून बारिस्टर जाणार आहेत व अकोल्याची ही कित्येक वकील मंडळी जाणार आहे. काय निकाल होतो पहावा आह्मांस असें समजलें आहे कीं थोडे दिवसापूर्वीं याच वादीचा प्रतिवादी गुलाबराय गजानन याजवर. याच हक्काबद्दल खामगाव कोर्टांतच फैसल झाला आहे ते व्हां न्यायाचा ओघ स्पष्टच दिसून येतो पण हल्लीचे प्रतिवादी युरोपियन आहेत व ते धर्म संबंधी तक्रार करितात ह्मणून वादास कारण उत्पन्न झालें आहे. अस्तु. ठराव काय होतो तो आह्मी आपले वाचकांस अवश्य कळवूं.

अकोल्याचे नाजर प्रकरणाचा बहुतेक निकाल लागला असें दिसतें. नाजरची दंडाऐवजी शिक्षा अर्धी कमी झाली. माधवराव क्लार्क यांचा निकाल झाला; त्याच प्रमाणें चोरीस गेलेली सुमार एकुणवीस हजाराची रकम इजविषयीं आमचा हैदराबादचा मित्र आह्मांस ऐकीव बातमी अशी कळवितो कीं ते रुपये नाजरकडून मूळ अफरातफर होण्याची सुरुवात झाल्या दिवसांपासून उघाडीस येईपर्यंत अकोल्यास जितके डिपुटी कमिशनर होऊन गेले तितक्यांवर त्यांच्या कारकिर्दीच्या काल मानानुरूप हिश्शे रसीनें घातली ही गोष्ट खरी असली तर न्याय दृष्टयाच झाली आहे सबब त्याविषयीं कांहीं ह्मणणें नाहीं परंतु द्रव्य चोरून घेऊन गेले ते नामानिराळेच राहून ढेकर देऊन बसले आणि मोठमोठ्या नेटिव अधिकाऱ्यांस उपाशी मरण्याचा प्रसंग आला व शेवटास पांच च्यार डिपुटी कमिशनरांस हा भुरदंड भरावा लागला. हें फार वाईट झालें.

मोर्शीचे अॅक्टिंग तहशिलदार रा. रा. गिरराव रामचंद्र यांस १०० रुपये पावेतों दिवाणी दावे पहाण्याचा अधिकार मिळाला.

यवतमाळचे नायब तहशिलदार रा. त्रिंबक गणेश यांस थर्ड क्लास मानिस्त्रेटचे अधिकार मिळाले.

डा० आर टी आवटएम. डी. वऱ्हाडचे स्यानिटरी कमिशनर यांस हक्काची रजा मिळाली होती पैकीं ३ दिवस शिलक राहिलेली रजा त्यांचें लिहिण्यावरून रद्द झाली.

मि० आर. डी. हेर अकोल्याचे आफिशिएटिंग असिस्टंट कमिशनर यांस फर्स्ट क्लास मानिस्त्रेटचा व ५००० रुपयांपर्यंत दिवाणी दाव्याचा अधिकार मिळाला.

मि० अबदुल हक्क साहेब कारंजाचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस तीन महिन्यांची डाक्टरचे सर्टिफिकिटावरून आजारीपणाची रजा मिळाली व ती प्रमाणें ते गेलें आठवड्यांत आपले देशीं गेले.

सर्जन जे. ए. लॅंग अकोल्याचे आफिशि० सिविल सरजन यांस ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली व तीप्रमाणें सोमवारीं ते रजेवर गेले व मि० जे वी पिटस त्यांचें काम पाहूं लागले.

मि० ताजुद्दीन हुसेन साहेब वाशिमचे असिस्टंट कमिशनर यांस पुढील महिन्याचे ६ वे तारखेपासून किंवा दुसरे कोणते तारखेपासून २६ दिवसांची हक्काची रजा मिळाली.

हैदराबादचे नवीन रेसिडेंट सर रिचर्ड मीड साहेब यांना १३ वे तारखेस निजाम सरकारांनीं दिवाण साहेबांकडे मोठी टोलेजंग मेजवानी दिली. रेसिडेंट साहेबांच्या पत्नीही या समारंभांत होत्या. १५ वे तारखेस रेसिडेंट साहेबानीं सर सालरजंग दिवाण यां सहित सिकंदराबाद व बोलारम एथील पलटणींच्या कवाइती १६ वे तारखेस सकाळीं पाहिल्या.

माजी रेसिडेंट मि. सांडर्स साहेब यांचे जाण्याचे संबंधानें जो मजकूर समजला आहे तो असा:—

सांडर्स साहेब यांची पत्नी आजारी असल्यामुळें तिजबरोबर विलायतेस आण्यासाठीं त्यांनीं ६ महिन्यांची रजा हिंदुस्थान सरकारास मागितली. त्यांनीं उत्तर लिहिलें कीं इतक्या थोड्या कामाकरितां आह्मास रेसिडेंटच्या कामावर कोणी चांगला मनुष्य मिळणार नाहीं याजकरितां जाणें च असल्यास आपण राजीनामा देऊन जावें. तरी आपण परत येईपर्यंत म्हैसूरच्या चीफ कमिशनरची जागा आपणाकरितां रिकामी राखिली जाईल. ही गोष्ट त्यांस न आवडून त्यांनीं राजीनामा दिला. व ते निघून गेले.

अकोला डिपुटी कमिशनर आफिसाच्या नकलनवीस लोकांच्या कोठडींतून कोर्ट नंबर ४च्या नकलनविसाचें दप्तर चोरीस गेलें. पोलिसाकडून तपास सुरू आहे.

हैदराबादेहून एका मित्राचें पत्र आल्यावरून समजतें कीं उमरावतीचे क्लार्क आफ धि कोर्ट यांसही नाजर प्रकरणीं दोषावरून कामावरून दूर करण्याचा रेसिडेंट साहेबानीं ठराव केला त्यांत इतकीच एक मेहेर नजर केली आहे कीं ते राजीनामा देत असल्यास घेऊन त्यांस मोकळें करावें या बातमीच्या संबधानें आह्मी पुढील अंकांत विशेष लिहू.

## वर्तमानसार

सिरापिस या नावाची आगबोट मागे मुंबईस परत येणार.

उज्जन व इंदूर येथें गारांचा पुष्कळ पाऊन पडला.

नागपुरचे जानोजी व सुलेमानशा राजे आग्र्यास जाणार आहेत.

प्रिन्स आफ वेल्सच्या बापाचा मरण दिवस तारीख १४ डिसेंबर हा होता ह्मणून ते दिवशीं ते कोठें फिरावयास वगैरे न जातां स्वस्थ बसून होते.

श्री० मल्हारराव गायकवाड यानीं ह लालखोराच्या मार्फतीनें दोसूभियास पत्र पाठविलें तें बैराग्याच्या मिशानें तो नेत असतां त्यास बडोद्यांत पकडलें.

रा. बळवंतराव राहूरकर याचे घराखालीं २ लाख रुपयांचा जवाहीर सापडला असें ह्मणतात.

होळकर सरकारांनीं गवर्नर जनरल हे इंदुरास असतां त्यांबरोबर एक महत्वाचा तह केला त्यांत होळकरांनीं आपल्या एथील टांकसाळ मोडून टाकण्याचें कबूल केलें आहे. व या कबुलायतीबद्दल हिंदुस्थान सरकार होळकरास दरसाल २५००० रुपये देणार असून होळकरांकरितां निराळ्या प्रकारचें नाणें इंग्रज सरकार पाडून देणार. या नाण्याची किंमत इंग्रजी रुपयाबराबर असून एका बाजूस इंग्रजी व दुसऱ्या बाजूवर होळकरी छाप असावयाचा व नाणें सर्व हिंदुस्थानभर चालावयाचें. नाणें मुंबईंतील टांकसाळेंत पाडून देणार आहेत.

गव्हर्नरजनरल हे कलकत्यास जाऊन पोचले.

प्रिन्स हे मद्रास इलाख्यांतील टिनेवली, तंजोर, त्रिचनापल्ली व मदुरा येथें जाणार नाहींत असें ठरल्यावरून त्यांच्या करितां त्या त्या ठिकाणीं ज्या तयाऱ्या चालल्या आहेत त्या बंद कराव्या असा कलेक्टरांस मद्रास सरकारचा हुकूम झाला असें ह्मणतात. अ. द.

धरणीकंप— पेशावर व लाहोर येथें धरणीकंप मोठा झाला आणि त्यांत छावणीच्या इमारतीचा नाश झाला. परंतु छावणींतील कोणीं जाया झाला नाहीं असें वर्तमान आहे. ज्ञा. प्र.

**चमत्कार**—गिसबोर्न येथें कांहीं मनुष्ये पाण्याकारितां जमीनींत खणीत असतां १७० फूट खोल गेले तों पाण्याचा लोंढा येऊन तो खळगा भरून आला व त्याबरोबर जमीनींतून ग्यासाचा लोट येऊन वाहूं लागला. असें पाहून एका हाटेलांत नळीचे योगानें तो ग्यास नेला तेथें तो रात्रंदिवस जळत आहे! बंद केला तर मात्र बंद रहातो! नाहीं तर दिवसाचे दिवस विजत नाहीं!

पुण्यास व सोलापुरास ७वे तारखेस मोठें वादळ झालें.

नवीन शेरिफ— येत्या वर्षांकरितां तारीख २० डिसेंबरपासून डा. टामस ब्लेनी यांस मुंबईचे शेरिफ नेमिलें.

सूटर साहेबांस सर हा किताब मिळण्याचें कारण पायनियरचा एक बातमीदार असें दाखवितो कीं, सूटर साहेबांची बहीण सर बार्टल फ्रीयर यांच्या बायकोच्या भावाची बायको आहे.

नाताळाबद्दल सालाबादीप्रमाणें तारीख २४ मिनहूपासून तारीख २ जानेवारी १८७६ पर्यंत सर्व हाफिसांस व कचेऱ्यांस रजा देण्याचा ठराव केला आहे.

नौसरी ( गुजराथ ) येथें एका पारशानें ब्रांडी व दुसरी एका प्रकारची विलायती दारू करण्याचा कारखाना काढण्याचें समजतें.

## जाहिरखबर

वऱ्हाडांतील व बाहेरच्या सर्व परोपकारेच्छु सत् गृहस्थांस विनयपूर्वक कळविण्यांत येते कीं अकोले येथें आज दोन वर्षांपासून मुसलमान जातींतील श्रेष्ट व संभावित गृहस्थांची "मोफरे हुलकुलुब" नावाची सभा स्थापन होऊन प्रति आठवड्यास ही सभा भरत असते. या सभेस विद्वान् प्रतिष्ठित गृहस्थ असल्या कारणानें सभेचा दिवसानुदिवस उत्कर्ष होत असून तींत सुधारणा होत आहे. ह्या सभेपासून सार्वजनिक कृत्यें व्हावीं व त्या कत्यांना मदत करावी हा हिचा मूळ उद्देश आहे. आतां ह्या सभेतील सत् गृहस्थांनीं एक सत्कृत्य स्थापण्याचा निश्चय केला आहे. तें हें कीं अनेक परोपकारी विद्वज्जनाच्या, तसेंच बड्या लोकांच्या, सरदारांच्या, व राजे लोकांच्या सहाय्यानें ४०००० रुपये वर्गणी जमवून गरीब विद्यार्थ्यां करितां आराबिक स्कूल स्थापन करण्यांत येईल. ह्या विद्यालयांत सरासरी ५० विद्यार्थ्यांचा समावेश होऊन त्यांना जेवण खाण, वस्त्र पात्र वगैरे सर्व पुरविलें जाईल. इंग्लिश तसेंच अरबी व वैद्यकी शिकविण्याकरितां उत्तम शिक्षकांची योजना करण्यांत येईल. अशा महत्कृत्यास दहा जणांची मदत पाहिजे.

एवढ्याकरितां सर्व सत्गृहस्थांस खालीं सही करणारांचे विनयपूर्वक सांगणें आहे. सर्वांनीं या सत्कृत्याला शक्त्यनुसार मदत करावी व परोपकाराचे श्रम घ्यावे व ज्यांची मदत करण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारास पत्रद्वारें कळवावें ही विनंती. तारीख १२ माहे डिसेंबर सन १८७५ इसवी.

मुक्काम अकोला.

सही मीर मजलीस जोरावरखां अध्यक्ष
मोफरे हुलकुलुब ताजनापेठ
अकोला.

टीप— ह्या संबंधी ज्यांना माहिती विचारणें असेल त्यांनीं उर्दू अखबारच्या मराठी भागाचे एडिटर व म्यानेजर रा० रा० धोंडो बाळकृष्ण देव यांस विचारले असतां मिळेल.

सही मीर मजलीस जोरावरखा अध्यक्ष
मोफरे हुलकुलुब ताजनापेठ
अकोला वऱ्हाड.

## ADVERTISEMENT.

The undersigned hereby humbly announces to the public of Berar and of the moffusil that a meeting entitled "Mofferul club" of the respectable class of Mahomedans has been established at Akola and is convened every sunday. This assembly is especially founded to mend the condition of our fellow brethren as well as of our dear country.

The assembly has now resolved to establish an institution named Arabic College. Where poor lads will be educated in Arabic, English, and medical science. There will be an accomodation for 50 students in this college. They will be given proper clothes and food also. A subscription of nearly 40000 Rs. is to be raised for this purpose. Therefore all the respectable and generous gentlemen, are requested by the undersigned to give their hand to this benevolent institution. All those who have to patronize this institution are requested to communicate with the undersigned.

(Signed) Meer majalis Joraweirkhan, president
Mpfferul club.

N. B. Those who require any information as regards this institution are requested to communicate with the Marathi Editor and Manager of the Urdu Akhabar Mr. Dhondo Balkrisna Deva.

Meer majalis Joravarkhan
President Mofferul
club Akola.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

## ग्रेट इंडियन पेनिनसुला-रेल्वे.

## नोटिस.

NOTICE.

DELIVERY OF GOODS AT POONA AND SHOLA POOR DISCONTINUED.

## पुणें व सोलापुर येथील स्टेशनावरून माल पावता करण्याची बंदी.

या लेखाच्या द्वारानें नोटिस देण्यांत येते ऐशीजे, चालू महिना संपल्या नंतर ही कंपनी पुणें आणि सोलापुर या शहरा मध्यें माल पोंचविण्याचें काम बंद ठेवील.

गाड्यांतून विऱ्हाडीं माल पोंचविण्याबद्दलचा जो अधिक दर पडत असे ( माल नेल्यानंतर ठिकठिकाणीं पोंचविण्याबद्दलचा हल्लींचा दर आणि तो पोंचविला जाणार नाहीं तेव्हांचा दर या दोहो दरांची वजावाकी करून जो येईल तो माल पोंचविण्याबद्दलचा अधिक दर होय ) तो पुढें ह्या दोन स्टेशनांवद्दल पडावयाचा नाहीं. गाड्यांतून माल विऱ्हाडीं पोंचवावयाचा नसल्यास जितका दर पडतो तितकाच या दोन ठिकाणीं कोणत्याही बाबतींत घेतला जाईल. जास्त घेतला जाणार नाहीं.

हेनरी कांडर,
जनरल ट्राफिक म्यानेजर.
मुंबई ता० ८ माहे डिसेंबर
सन १८७५ इसवी.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वे.

NOTICE

## नोटिस.

REDUCTION OF RATE FOR WINES AND SPIRITS IN BOTTLES, AND RULES FOR CHARGING FRACTION OF ANNAS.

**बाटल्यामध्यें भरलेल्या दारू व अर्कांवरील दर कमी करण्याबद्दल आणि एका आण्यापेक्षां कमी भाड्याचे भाग कसे घ्यावे याविषयीं नेमाबद्दल सूचना.**

दारू व अर्क— एतद्द्वारें सूचना देण्यांत येतें कीं चालू महिन्याचे अखेरीपासून बाटल्यांत भरलेल्या दारू व अर्कांवरील दर, ते पदार्थ साधारण मालाच्या मालिकेंत ४ थ्या वर्गांत आहेत ते ३ ऱ्या वर्गांत घालून कमी केले जातील.

मुंबई व भायखळा आणि पुणें व खडकी यांच्या दरम्यान जाणाऱ्या येणाऱ्या बाटलींत भरलेल्या दारूवर व अर्कावर दर मणामागें १२ आण्याप्रमाणें जो खासगी दर आहे तो तसाच राहील आणि या पदार्थांकरितां जे दुसरे खासगी दर आहेत ते सर्व रद्द केले जातील.

एका आण्याचे अपूर्ण भाग— चालू महिन्याच्या अखेरीस प्रत्येक टिकिटीकरितां व तसेंच माल आणि पार्सलें व दुसऱ्या वस्तु याच्या भाड्यांबद्दलच्या दरांत एका आण्यापेक्षां कमी भाग आले असतां ते घेण्याविषयींचे खालीं लिहिलेले नियम चालू होतील.

एकंदर भाड्याची रकम जेव्हां चार आण्याच्या वर असते तेव्हां आण्याचा अपूर्ण भाग जर ६ पैपेक्षां कमी असला तर तो मुळींच सोडला जाईल. आणि ६ पै किंवा जास्त असला तर त्याबद्दल एक आणा घेतला जाईल. एकंदर भाडें घेण्याचें तें जर चार आण्यापेक्षां कमी असलें तर प्रत्येक वेळीं पाव आणा कमीजास्त घेतला जाईल. उदाहरणार्थ जर एखाद्या टिकिटीचा दर अथवा मालाचें भाडें खरोखर ५ रुपये २ आणे ६ पै होत आहे तर त्याबद्दल ५ रु. ३ आ. घेतले जातील. किंवा असें समजा कीं भाडे ९ रु. १ आ. व ८ पै आहे तर त्याजबद्दल ९ रु. ५ आ. घेतले जातील. परंतु जर टिकिटीचा दर अथवा मालभाडें १२ रु. ७ आ. ५ पै आहे तर त्याजबद्दल १२ रु. ७ आ. मात्र घेतले जातील. तसेंच टिकिटीचा दर जर खरोखर ३ आ. व ४ पै होत असला तर त्याजबद्दल ३ आणे व ६ पै घेतले जातील.

उतारूचा टिकिटीचा दर कमींत कमी ६ पै. आहे व माल आणि पार्सलें यांचा कमींत कमी दर पूर्वीं जाहीर केल्याप्रमाणेंच राहील.

हेनरीकांडर.
जनरल ट्राफिक म्यानेजर
मुंबई ता० ९ माहे नोवेंबर
सन १८७५ इसवी.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वे

NOTICE

## नोटिस

COLLECTION AND DELIVERY OF GOODS AND PARCELS AT NAGPOOR AND CAMTHI DISCONTINUED.

## नागपुर व कामठी स्टेशनावर माल व पार्सलें जमा करून आणणें व तीं पावतीं करण्याची बंदी.

जाहिर केलें जातें कीं, चालू महिन्याचे अखेरीपासून नागपुर व कामठी स्टेशनावर माल व पार्सलें जमा करून आणणे व तीं पावती करण्याचें काम करणें ही कंपनी बंद करील.

माल व पार्सलें जमा करून आणणें तीं व पावता करण्याबद्दल जें जास्त भाडें पडत असे तें ( माल व पार्सलें जमा करून आणून पावतीं केलीं असतां एकंदर जें हल्लीं भाडें पडत आहे तें व माल व पार्सलें जमा करून पावता केला नसतां जें भाडें पडेल तें त्याचें अंतर ) या स्टेशनावर घेतलें जणार नाहीं "नाटकार्टेड रेट्स" ह्मणजे माल व पार्सलें जमा करून आणून पावतीं केलीं नसतां जें भाडें पडावयाचें तें पडेल.

हेनरी कांडर,
जनरल ट्राफिक म्यानेजर
मुंबई ता० ८ माहे डिसेंबर
सन १८७५ इसवी.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० २८ माहे डिसेंबर सन १८७९ इ० अंक ५२


## वऱ्हाडसमाचाराचें किंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १।८ |
| " अखेर | २ |

... नवीन वर्गणीदार होऊं इणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आ... खेरीज ... सुरू केले जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती.

### मल्हाररावाचें टक.

या नावाचीं मनोरंजक पुं वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आली आहे. किंमत दर प्रतीस एकाया दोन आणे. बाहेर गावीं मागाविणे टपाल हशीलाबद्दल दोन आणे शि लागतील.

### प्रेमबंधन

या नावाची सुरस व मनोरंजक उत्तम कादंबरी नुकतीच छापून त झालेली वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीकरितां आली आहे. किंमत दीड या. बाहेर गावचे घेणारास डाक हशीलतीन आणे शिवाय पडेल.

### ...वाच्या शिलकीबाक्यां- वर व्याज द्यावें लागेल.

आमच्या कित्येक वर्गणीदारांकडे दोन दोन व तीन तीन वर्षांच्या बाक्या येणें राहिल्या आहेत त्या त्यांनीं आतां लगी रीतीनें लवकर पाठविल्यास आह्मांवर त्यांची मोठी मेहेरबानी होईल व त्यांचें आणि आमची दगदग चुकेल. आणि अशी त्यांनीं कृपा न केल्यास निरुपायमुळें त्या बाक्या कायदेशीर रीतीनें वसूल करणें आह्मांस भाग होईल; आणि तसेंच करावें लागेल तेव्हां प्रत्येक सालची बाकी घेण्यास योग्य झाल्या दिवसापासून तिचें व्याज दरमहा दर शेकडा दोन रुपये प्रमाणें जें आकारिल ते तिजवर चढवून वसूल करण्याची तजवीज केली जाईल हें सर्वांस अगाऊ कळविण्यांत येत आहे.

तसेंच ... ल बाक्या मागण्या ... कागल्या गोष्टी ... ळां पत्रें लिहिलीं ... जातील त्यांचा ट... व्य पाठवावे लाग... ल्यास त्यांचा खर्चही या त्या कुळांवर आकारला जाईल हेंही सर्वांस कळविलें.

तारीख ७ माहे नोवेंबर सन १८७९ इ०

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

### ग्रेट इंडियन पेनिनसुला-रेलवे.

NOTICE.

### नोटिस.

DELIVERY OF GOODS AT POONA AND SHOLAPOOR DISCONTINUED.

### पुणें व सोलापुर येथील स्टेशनावरून माल पावता करण्याची बंदी.

या लेखाच्या द्वारानें नोटिस देण्यांत येते ऐशीजे, चालू महिना संपल्या नंतर ही कंपनी पुणें आणि सोलापुर या शहरामध्यें माल पोंचविण्याचें काम बंद ठेवील.

गाड्यांतून निव्हाडीं माल पोंचविण्याबद्दलचा जो अधिक दर पडत असे ( माल नेल्यानंतर ठिकठिकाणीं पोंचविण्याबद्दलचा हल्लींचा दर आणि तो पोंचविला जाणार नाहीं तेव्हांचा दर या दोहा दरांची वजाबाकी करून जो येईल तो माल पोंचविण्याबद्दलचा अधिक दर होय ) तो पुढें ह्या दोन स्टेशनांबद्दल पडावयाचा नाहीं. गाड्यांतून माल निव्हाडीं पोंचवावयाचा नसल्यास जितका दर पडतो तितकाच या दोन ठिकाणीं कोणत्याही बाबतींत घेतला जाईल. जास्त घेतला जाणार नाहीं.

हेनरी कांडर,
जनरल ट्राफिक म्यानेजर.
मुंबई ता० ८ माहे डिसेंबर
सन १८७९ इसवी.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

### ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे

NOTICE

### नोटिस

COLLECTION AND DELIVERY OF GOODS AND PARCELS AT NAGPOOR AND CAMTHI DISCONTINUED.

### नागपुर व कामठी स्टेशनावर माल व पार्सलें जमा करून आणणें व तीं पावतीं करण्याची बंदी.

जाहिर केलें जातें कीं, चालू महिन्याचे अखेरीपासून नागपुर व कामठी स्टेशनांवर माल व पार्सलें जमा करून आणणें व तीं पावती करण्याचें काम करणें ही कंपनी बंद करील.

माल व पार्सलें जमा करून आणणें तीं व पावता करण्याबद्दल जें जास्त भाडें पडत असे तें ( माल व पार्सलें जमा करून आणून पावतीं केलीं असतां एकंदर जें हल्लीं भाडें पडत आहे तें व माल व पार्सलें जमा करून पावता केला नसतां जें भाडें पडेल तें यांचें अंतर ) या स्टेशनावर घेतलें जाणार नाहीं "नाटकार्टेड रेट्स" ह्मणजे माल व पार्सलें जमा करून आणून पावतीं केली नसतां जें भाडें पडावयाचें तें पडेल.

हेनरी कांडर,
जनरल ट्राफिक म्यानेजर
मुंबई ता० ८ माहे डिसेंबर
सन १८७९ इसवी.

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. मी प्रवासांत असल्यामुळें कांहीं दिवसापासून आपला व माझा पत्रव्यवहार बंद झाला तरी हल्लींचे माझे प्रवासांत पहाण्यांत व ऐकण्यांत थोडाबहुत फार मजकूर आला तो पाहून व ऐकून माझ्यानें आपणास तो लिहून पाठविल्यावाचून रहावत नाहीं. तरी हल्लीं च्यार ओळी लिहून पाठविल्या आहेत त्यास येत्या अंकीं जागा मिळेल अशी आशा आहे.

चिखली येथें शाळागृह, पोलिस स्टेशन, आणि तहशिलदार कचेरी असे तीन सरकारी कारखाने आहेत.

शाळेचे हेडमास्तर फार हुशार असून ते आपले कामांत नेहमीं उद्युक्त असतात असें माझे आढळण्यांत आलें.

पोलिस स्टेशनांतही मी उभ्याउभ्यीं गेलों परंतु तत्संबंधीं मला फारशी माहिती मिळाली नाहीं.

तहशिलदार कचेरी मोठी असून तिची रचनाही चांगली आहे. अंमलदार आपले काम वक्तशीर करून रयतेस उपद्रव तरे बिलकूलच देत नाहींत असें झटलें असतां चालेल. त्याचप्रमाणें बहुतेक कारकून आप आपले कामांत तत्पर असतात. उमेदवार सुमार ४।५ असून ते पुष्कळ काम करितात. परंतु कारकुनाची संख्या कामाच्या मानानें फारच कमी आहे इकडे त्या खात्याचे अधिकारी लक्ष पुरवितील तर बरें होईल.

उमेदवार लोक मेहनत करितात. परंतु त्यांचे उत्पन्नाची फार अंदाधुंदी आहे. कोणास रुपयाचे १६ आणे मिळतात आणि कोणास अर्धी पई देखील मिळत नाहीं. असें होण्यास कारकुनाच्या दुर्लक्षाखेरीज दुसरें कारण ह्मणतां येत नाहीं. इकडेस अधिकारी लक्ष पुरवून व्यवस्था करतील तर बरें होईल.

चिखली तालुक्यांतील आंदेरे येथील चीफ कानस्टेबल रा. रा. मनोहर नारायण यांणीं येथील कचेरीतून पळालेला कैदी मोठ्या सिताफीनें व फार श्रम करून तो [ कैदी ] पळाल्याचे आठवे दिवशीं वाशिम जिल्ह्यांत लोणीस पकडला ह्या त्यांच्या श्रमाबद्दल योग्य बक्षीस त्यांच्या अधिकाऱ्यांनीं त्यास द्यावें हें योग्य आहे.

एडिटरराव पत्रविस्तार फार झाला सबब माफी मागून पुरें करितों व प्रवासास लागतो कळावें लोभ असावा ही विनंती.

तारीख १९ डिसेंबर सन १८७९ इसवी

एक
प्रवासी

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. कांहीं दिवसा पूर्वीपासून मी तुमचे पत्र वाचित असतों आणि त्यापासून मला फार फायदे आहेत. आज मला एक उत्कंठा झाली आहे ती आपणास मी निवेदन करितों, व त्याप्रमाणें आपले दिव्यपत्रीं हीस जागा देऊ... जाहिर कराल अशी आशा आहे.

कोणी मनुष्य अगर संभावित ... कशाही गुणाचा असेल तरी कांहीं संबंध असल्याशिवाय तसा ह्मणूं जातां अडचण आहे. परंतु तोच मजकूर आपले पत्रांतून प्रदर्शित केल्यास अधिक रूपास येतो असें आपल्या पत्राचें महात्म जाणून ह्या च्यार ओळी लेखन केल्या आहेत यास कृपा करून अभ्युथ्थान मिळावें

ह्या बुलढाण्या जिल्ह्याचे सांप्रतचे डेपुटी इन्स्पेक्टर ( शाळांकडील ) ह्या जिल्ह्यास नेमले गेल्यापासून आज अदाजा करितां दीड वर्षेही कमी असेल. त्यांनीं एव्हढ्या थोड्या वेळांत कुशळतेच्या व मेहनतीच्या जोरानें जो एकंदर रंग आणिला आहे तो आमचे सारख्या या भागाचे रहिवासी लोकांच्या डोळां भरल्याशिवाय रहाणार नाहीं. प्रत्येक शाळेचें अटेन्ड...

...न्पासही तसाच कांहींअंशीं ज्यास्तच आहे. याबद्दल सरकारी कागदपत्रीं जरी दर्शित होत नसेल तरी पहिल्यापेक्षां जास्त स्वच्छ यांत कांहीं बाध नाहीं. सूर्य कां मुष्टींत झाकुल्या जाईल? ह्मणून ही सुधारणा आमचे दयाळु सरकारच्या दृष्टिगोचर नसेल असें कसें ह्मणावें परंतु आमचे रयतेचें सुख दुःख सरकारास जाहीर करणें हा आमचा प्रजाधर्म होय तरी या आह्मच्या मेहेनती कुशळ व हुशार सरदाराव-

ल सरकारानें उत्तम मत ठेवून बढतीच्या जागा भरते वेळीं यांस देण्याबद्दल दुर्लक्ष्य न करणें याबद्दल आमची नम्र प्रार्थना आहे.

एक पुढारी
चित्तचाळक.

---

## जाहिरनामा.

विद्यमान डिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपुर याजकडून तमाम लोकांस जाहिर करण्यांत येते कीं, जिल्हे इलिचपुर येथील सन १२८५ । ८६ फसली ह्मणजे इसवी सन १८७६ । ७७ सालाबद्दल अपकारी कलाली, अफू, गांज्या विषयुक्त वगैरे मक्त्याचा हरास तारीख १३ जानेवारी सन १८७६ इसवी रोजीं दिवसां दहा वाजतां मेहेरबान डिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपुर यांच्या कचेरींत होणार आहे. ज्याची घेण्याची खुशी असेल त्यानीं सदर्हू तारखेस हजर व्हावें. मक्त्याचे गाव व शर्यती लिलाव समयीं उघड रीतीनें वाचून दाखविले जातील. लिलावांत बोलूं इच्छिणारानें प्रथम २०० रुपये कोर्टांत भरल्यावाचून बोलण्याची परवानगी नाहीं. ह्या संबंधी कोणास अधिक माहिती पाहिजे असल्यास त्याणें डिपुटी कमिशनर आफिसांत येऊन हजर व्हावें ह्मणजे दिली जाईल.

तारीख २२ माहे दिसेंबर सन १८७५ इसवी.

परशराम जगन्नाथ
क्लार्क आफ धि कोर्ट.

J. T. Bushby.
डिपुटी कमिशनर
जिल्हे इलिचपुर.

---


## वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य १४ शके १७९७.


## प्रिन्स आफ वेल्स.

मद्रासेहून १८ वे तारखेस प्रिन्स निघाले ते तारीख २३ गुरुवार रोजीं दोन प्रहरीं कलकत्त्यास पोंचले. त्यांचा तेथील नित्य क्रम प्रसिद्ध झाला आहे तो असा:—

२३ वे तारखेस प्रिन्सेप घाटावर प्रिन्स उतरतील तेथें २१ तोफांची सरबत्ती होऊन व्हाईसराय, राजे रजवाडे व युरोपियन आफिसर यांच्या भेटी होतील व समारंभानें मिरवणूक निघून स्वारी सरकारी बंगल्यावर जाईल. २४ वे तारखेस सकाळीं नेटिव राजाच्या भेटी होतील. संध्याकाळीं शर्यतीच्या जागीं दरू काम सुटेल ते पहाण्यास जातील. व त्याच दिवशीं दीपोत्साह होईल तो पहात पहात स्वारी परत जाईल. २५ वे तारखेस सकाळीं भजनालयांत प्रार्थनेस जातील. व तिसरे प्रहरीं बरकपुराकडे जातील व सोमवारीं प्रातःकाळीं नदींतून जलमार्गानें परत येतील व राहिलेल्या राजे लोकांच्या भेटी घेतील. तिसरे प्रहरीं लेफटेनंट गवरनरच्या मेजवानीस बगीच्यांत जातील. रात्रीं सरकारी बंगल्यांत मोठा बाल होईल. २८ वे तारखेस राजे लोकांच्या परत भेटी होतील. तिसरे प्रहरीं लेव्ही होईल. व रात्रौ मराठी पध्धतीची कांहीं कर्मणूक होईल. २९ वे तारखेस शिल्लकी राहिलेल्या राजे लोकांच्या भेटी होतील. तिसरे प्रहरीं शर्यती पहाण्यास जातील. व रात्रीं शिकारी निमित्त गोलंडूत जावयास निघतील. व ३१ वे तारखेस परत येतील. त्या रात्रीं टोनहालांत पब्लिक बाल होईल. पहिले तारखेस स्टार आफ इंडियाची पदवी देण्याचा समारंभ होईल. रात्रीं नाटक पहाण्यास जातील. दुसरे तारखेस रविवारीं प्रार्थनेस भजनालयांत जातील. तिसरे तारखेस युनिव्हर्सिटी हाल व मेडिकल कालेज पहातील. व संध्याकाळीं बराकीपुराकडे जातील.

कलकत्त्यास प्रिन्सचे आदरार्थ राजे जमले आहेत त्यांतील मोठमोठ्यांचीं नावें:—

बनारसचे राजे, पन्हाचे राजे, रेवाचे राजे, ग्वालेरचे शिंदे, इंदुरचे होळकर, जोदपुरचे राजे, जयपुरचे राजे, काश्मीरचे राजे, त्रावणकोरचे राजे, उदेपुरचे राजे, [illegible] राजे, जहोरचे राजे, बर्द्वानचे राजे, भूपाळची बेगम, हैदराबादचे दिवाण सर [illegible]जंग इत्यादि.

---

## कलाकौशल्य.

गेल्या अंकांत कला कौशल्यांतील वस्त्र गोपन या भागावर थोडें लिहिलें आतां आज तक्षण ह्मणजे सुतार काम आणि वास्तु ह्मणजे गवंडी काम या विषयीं थोडें लिहू.

वस्त्रोपनापेक्षांही याविषयीं लिहिणें फार मौजेचें आहे व या २ कसबामध्यें आपण किती नीचतेप्रत प्राप्त झालों आहों व आपले पूर्वज आपणापेक्षां किती श्रेष्ठ होते याचा विच्यार केल्यावर आपणास दुःख वाटल्या शिवाय कधींही रहाणार नाहीं. फार प्राचीन कालांविषयीं विच्यार केला तर या २ कला पूर्वीं पूर्णतेस जाऊन ठेपल्या होत्या असें आपणास अनुमान करितां येतें. रावणानें सीताहरण केलें, व तिला प्राप्त करून घेण्यासाठीं श्रीरामचंद्रानें कपिगणांचें सहाय्य घेऊन लंकेत जातां यावें ह्मणून सिंधूवर सेतु बांधिला, ज्या सेतूच्या सत्यतेविषयीं अजून पुष्कळ प्रमाणें दृष्टीस पडतात. आतां सेतु या संस्कृत शद्बाचा अर्थ बांध किंवा बांधारा असा करितां येईल. अलीकडे इंग्रजांनीं आणि दुसऱ्या पुष्कळ सुधारलेल्या राष्ट्रांनीं आपापल्या हद्दांत सोईकरितां पुष्कळ बांधारे बांधिले आहेत, परंतु हिंदुस्थानचे दक्षिण टोंकापासून लंकेपर्यंत ज्याचा विस्तार आहे. अशा प्रकारचा अन्य ठिकाणीं एखादा सेतु बांधिल्याबद्दल आमचे ऐकण्यांत आलें नाहीं. त्याप्रमाणें रामायणामध्यें लंकेच्या ऐश्वर्याचें वर्णन करून पुढें रावणाच्या वाड्याविषयीं वर्णन केलें आहे त्याचप्रमाणें भारतामध्यें पांडवांच्या अलौकिक व अत्युत्तम मयसभेचें जें स्वरूप सांगितलें आहे त्यावरून या शिल्पकलेच्या पूर्णतेविषयीं आपली खात्री होते. आतां स्थल संकोच्यामुळें त्यांचें भाषांतर आह्मांस येथें करितां येत नाहीं, तथापि पुढें एखादे वेळेस आह्मी आपल्या वाचकांस तत्संबंधानें माहिती देऊं. आतां अर्वाचीन कालाविषयीं विच्यार करूं. कित्येक असा सहज प्रश्न करितील कीं आमच्या हिंदुस्थानामध्यें शिल्पकला कमी आहे कीं काय? आतां या प्रश्नाचा जबाब देणें ह्मणजे फारसें कठीण आहे असें नाहीं. एखादि कला पूर्णतेस आली असें केव्हां ह्मणावयाचें? जेव्हां त्या कलेपासून देशांतील बहुतेक लोकांस थोड्या द्रव्यानें फायदा करून घेता येतो तेव्हां. राजे लोकांनीं कोट्यावधि रुपये खर्च करून आपल्याकरितां एखादा वाडा बांधिला, किंवा एखादें उत्तम वस्त्र काढविलें ह्मणून ती कला त्या देशांत पूर्णतेस आली असें ह्मणतां येणार नाहीं. जेव्हां देशाच्या विस्ताराच्या मानानें तशा प्रकारच्या अनेक इमारती ठिकठिकाणीं थोड्या खर्चांत होऊं लागतील तेव्हांच ती कला भरभराटीस आली असें ह्मणतां येईल. व याच आधारावरून आमच्या देशाच्या उत्तर भागीं आग्र्यास शहाजान बादशहानें लक्षावधि रुपये खर्च करून ताजमहाल जरी बांधिला व त्या ताजमहालाची कीर्ति जरी दिगंतरीं पसरली आहे, तथापि शिल्प कला उत्तर हिंदुस्थानांत शिखरास चढली होती असें आमच्यानें ह्मणवत नाहीं तथापि आमचें मत असें आहे कीं जर राजाश्रय तसाच मिळत गेला असता तर त्या कलेस शिखरास चढविणारे लोक आह्यामध्यें होते व आतांही कित्येक असतील. हिंदुस्थानच्या विस्ताराच्या मानानें पाहिलें असतां आग्र्याचा ताजमहाल, वेरूळचीं लेणीं, अजिंठ्याचीं लेणीं आणखी एक दोन ठिकाणीं जे पहाण्यासारखे किल्ले आहेत ते कांहींच नव्हत असें ह्मटलें पाहिजे. निदान ताजमहाला सारख्या एक हजार इमारती जर आपल्या देशांत झाल्या असत्या तर शिल्प कलेचा कळस झाला असें आपणास ह्मणतां आलें असतें पण तशी स्थिति मुळींच नाहीं व याच कारणावरून इतली देशांतील मनोरे जरी अनुपमेय आहेत, मिसर देशांतील पिरामिदी जरी आश्चर्य वाटण्याजोग्या आहेत, चीन देशांतील भिंत जगांतील सात अद्वाढव्य कृत्यांपैकीं जरी एक कृत्य आहे तरी केवळ एकेका इमारतीच्या जिवावर शिल्पकला त्या त्या देशांत पूर्णतेस गेली असें ह्मणतां येत नाहीं. त्याप्रमाणेंच मळसूत्रानें कामें करण्याची कला आह्मांस ठाऊक होती असें ह्मणतां येत नाहीं. कारण बायकांच्या कानांतील बुगड्या व पायांतील साखळ्या जरी आह्मी फार दिवस मळसूत्रानें बसवीत आलों आहों तथापि आतां ज्याप्रमाणें मोठे मोठे पूल पाहिजे तेथें नेऊन या मळसूत्र मुळें (स्क्रू) जोडून देतां येतात, त्याप्रमाणें त्याचा उपयोग करण्याची कल्पना आह्मास पूर्वीं सुचली नव्हती.

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, एखादि कला पुढें सरण्यास तिला पुष्कळ गोष्टी अनुकूल व्हाव्या लागतात. त्यांस मुख्य राजाश्रय पाहिजे. दुसरी गोष्ट देशांत स्वस्थता असली पाहिजे. शांततेंत होणारीं कामें देशांत स्वस्थता असल्याखेरीज कधींही उदययावयाचीं नाहींत हा सत्य सिद्धांत आहे. तिसरी गोष्ट लोकांच्या अंगीं हौस, दृढ चढा ओढ इत्यादि स्वाभाविक गुण ले पाहिजेत. हे ज्या लोकांच्या अंगीं नाहींत त्या लोकांचा देश श्रेष्ठतेप्रत कधीं प्राप्त होणार नाहीं. आणि चवथी गोष्ट अशी कीं देशांतील मापें वगैरे सर्व सारखीं असलीं पाहिजेत. आतां च्या इमारती कटींत जरी कमी असतात, [व त्या असण्याला पुष्कळ सयुक्तिक कारणें आहेत] तथापि त्या बांधल्या जाण्यापूर्वीं तद्विषयीं नकाशे काढून किमतीचा अंदाज करण्याची जी रीति आहे ती खरोखरच हिताची आहे. अशी रीति पूर्वीं ठाऊक असती तर आणखीं बरीच कौशल्यांत झालीं असतीं. आपल्या मापन पद्धतीचा जर विचार केला तर हसें आल्यावाय कधींही रहाणार नाहीं. ज्याचीं त्याच्याप शीं. कोणाला ही क्षणभर तुझें मला दे ह्मणून दुसऱ्याकडे जायलाच. पहा उदाहरणार्थ तीन मुष्टी ह्मणजे एक वीत, दोन विती, ह्मणजे एक हात दोन हात ह्मणजे एक दंड आणि साडे तीन हात ह्मणजे एक पुरुष. आतां ही आणि हा हात कोणाचा ह्मणून समज. बाजारांत जाऊन घोतर घ्यावयाचें झाल्यास तर आमचें माप हाताचें. दुकानांत दुकानदाराचा आणि घेणाराचा आधीं कांहीं तंटा होतो. पुढें सौदा होऊन घरीं आल्यावर एखाद्या अखूड हात्यानें मोजून घेतें असेल त्यापेक्षां दोन हात अधिक कमी कीं घेणारा फुगारतो. पुढें एखाद्या वृक्रपी आजानुबाहूनें दोन हात कमी ह्मटलें याची वृत्ती झालीच खिन्न. अहो हीं हीर किती खोल आहे? असेल झालें पांसात पुरुष. आहो येथून खडकवासले किती लांब आहे? एक ह्मणतो सोपुरी कोसानें येईल तीन कोस, व सातारी कोसानें येईल पांच कोस. दुसरी गम्मत वास करतां करतां एखाद्या गांवाजवळ जा आणि वाटेनें एखादा कुळवाडी भेटला ह्मणजे त्याला विचारावें, कां हो पाटीलबुवा, गांव किती लांब आहे? ह्मणजे तो ह्मणतो जा दादा फार झालं तर कुत्र्याचा भोंकभर नाहीं तर हांकभर असेल झालं. दुसरा प्रश्न असा करावा कीं, पाटील बुवा दिवस अजून कितीसा आहे? याचें ठरीव उत्तर "हाय अजून कासराभर" असें ह्मटकून यायचें व याच रीतीनें [illegible] आणि कच्चे कोस अशा प्रकारचे शद्ब आपल्या कानावर वारंवार येतात. अशी ज्या देशांत मापाची स्थिति त्या देशां[illegible] शिल्प कला उदयास कोठून येईल?

आप[illegible]तांत इंग्रज ख[illegible]चित स्तुतिपात्र आहे [illegible] व मुंबई इलाख्यांतील [illegible]पल्या येथील ठाउ[illegible] सेटलमेंट आफिसरा. येथील एजिं[illegible]टचे जागेवर रे[illegible] लिहून पाठविली, [illegible]क्टर जनरल नेमणा[illegible]टा येथें आल्या त्या

बसवून दिल्या, व अशा प्रकारें केलेली टाऊन हालाची जमीन स्वल्प पहाण्यांत आहे. त्याप्रमाणें मुंबई इलाख्यांत लाखो ठिकाणीं पूल बांधिले आहेत व बांधिले जात आहेत. इकडील एंजिनिअर मनच्छ तयार करून ठेवितात व बर्किंगहामहून वरचें लोखंडी काम मागवितात. तेथील लोक यांच्या लिहिण्यावरून ते जोडून इकडे पाठवितात. व जसा कीं बर्किंगहाम येथेंच पूल चालला आहे, त्याप्रमाणें येथील लोक तिकडून आलेलें काम बसवून देतात. या प्रकारची इंग्रजांच मापनाची स्थिति आहे. आपले सुतार घे जोडतात त्यांत सुताची तरी फट येतेच. आपलीं घरें पैसे खर्च करूनही नेटकीं होत नाहींत याचें कारण सुतांच्या व गवंड्याच्या अंगीं असलेलें मूर्खपण होय. नाजुक काम आपल्या पैकीं फच थोड्या लोकांना करतां येतें.

(पुढें चालू.

## अकोला नार्मल स्कूल.

(लिहून आलेला जबूर)

एथील नार्मल स्कुलांतील पहिल्या व दुसऱ्या वर्षाचे विद्यार्थ्यांचे दाखले मिळविण्याची परीक्षा गेल्या नंवबर महिन्यांत झाली तिचा निकाल फारसाईट झाल्याविषयीं काल आह्मास समजलें. त्यावरून जे कांहीं विच्यार आह्मास सुचले आहेत ते आम्ही आज आमचे वाचकांस कळवितों. हें स्कूल स्वर्गवास डा० सिंक्लेर साहेब यांणीं सन १८६६ इसवी सालीं स्थापन केलें. पुढें दोन वर्षांनीं मि० लीवार्नर साहेब आक्टिंग डायरेक्टर होते त्यांनीं या स्कुलाकडे पुष्कळ लक्ष्य देऊन तें सुधरण्याविषयीं बरेंच काम केलें होतें असें त्यांनीं लिहिलेल्या वार्षिक रिपोर्टावरून दिसतें. ते गेल्यावर यांचे पाठीमागून मि० क्यांडी साहेब डायरेक्टरचें काम पाहूं लागले. त्यांणींही लीवार्नर साहेबांनीं लिहून ठेविल्याप्रमाणें हें स्कूल अवश्य सुधारलें पाहिजे असें पाहू एकदम फेरफार केला तो असा कीं, पहिलें नार्मल स्कूल हें नाव मोडून त्याचेजागीं ट्रेनिंग कालिज हें नवें नाव दिलें. यांणीं पाहिलेल्या बेळगाव येथील ट्रेनिंग कालेजाप्रमाणेंच येथेंही प्रिंसिपाल व दुसरे मास्तर करून अभ्यास व नियमही बहुतेक त्यासारखेच ठरविले. नुकतेच कांहीं महिने पर्यंत मि० इलियट साहेब डायरेक्टरचें काम पहात होते तेव्हां त्यां[illegible]च्या स्कुलाविषयीं कांहीं लिहिलें [illegible]सें आह्मी ऐकतों.

हल्लींचे डायरेक्टर हे त[illegible]चे नांवांकित ट्रेनिंग कालेजाचे [illegible]पाल होते तेव्हां तसल्या प्रकारचे का[illegible]न कोण कोणत्या गोष्ट[illegible] अवश्यकता असून उत्त[illegible] [illegible]रें होईल हें त्यांस [illegible] नाहीं व तसें [illegible]लय. [illegible] [illegible]व वेळीं आली [illegible]झाले असें

कित्येकांस निदान गुलांस तरी वाटत आहे. असो. ट्रेनिंग कालेज किंवा नार्मल स्कूल करण्याचा मुख्य उद्देश हाच असावा कीं, वऱ्हाड प्रांतांतील शाळांस चांगले शिकलेले वऱ्हाडी मास्तर थोड्या किमतींत मिळावे. कारण शाळाखातें सुरू झाल्यापासून बाहेरून मास्तर आणावे लागत असल्यामुळें त्यांस पगार अधिक द्यावा लागतो. पण हा कालेज स्थापण्याचा हेतु कितपत सिद्धीस गेला असेल तो असो आह्मास माहित झालेल्या गोष्टींवरून असें अनुमान होतें कीं तो अंशतः मात्र सिद्धीस गेला असावा. दरसाल पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं निम्म्यापेक्षां अधिक वऱ्हाडचे नतून खानदेश वगैरे जवळचे प्रांतांतले असतात हें आह्मास माहित आहे. आतां जे पास होतात ते तरी चागले शिक्षक होतात असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण वऱ्हाडांतील बहुतेक डे० ए० इन्स्पेक्टरांनीं नार्मल स्कुलांतील विद्यार्थ्यांस चांगलें शिकवितां येत नाहीं असें ह्मटल्याविषयीं आह्मास माहित आहे. तसेंच नार्मल स्कुलांतील विद्यार्थी मास्तर झाला तर त्याचा पगार निदान दहा रुपये तरी असतो. आणि तेवढ्याच पगारावर मुंबईची म्याट्रिक्युलेशन परिक्षा पास झालेलाही मनुष्य मिळतो. तेव्हां इकडील मास्तर स्वस्त मिळतात असेंही नाहीं. अशी जर एकंदर स्थिति आहे आणि ज्या हेतूकरितां नार्मल स्कूल किंवा ट्रेनिंग कालेज स्थापन केलें ते हेतु सिद्धीस जात नाहींत तर ते हेतु सिद्धीस जावे ह्मणून दुसरी एखादी चांगली योजना झाली पाहिजे. व ती योजना आमचे हल्लींचे हुशार व नार्मल स्कुलाचे कामांत निष्णात डायरेक्टर करतील यांत कांहीं संशय नाहीं. परंतु आज आह्मास एक योजना सुचली आहे तिजविषयीं कांहीं विच्यार झाल्यास बरें होईल. ती योजना अशी:=

प्रत्येक जिल्ह्यांत दोन चांगल्या मिडल क्लास शाळा निवडून काढून त्यांत दरमहा सडा सहा रुपये पगाराचे पांच पांच पगारी विद्यार्थी शिक्षकांचे काम शिकण्याकरितां दोन वर्षांचे करारानें ठेवावे. ते वऱ्हाडचे रहाणारे असून त्यांचें वय १८ वर्षांचें असावें व त्यांणीं हायस्कूलची प्रवेश परीक्षा ह्मणजे सहावी यत्ता पास असावें. त्या विद्यार्थ्यांनीं दोन वर्षें पर्यंत चांगल्या मास्तराचे हाताखालीं राहून डे० ए० इन्स्पेक्टर यांचे समोर पांचवे यत्तेपर्यंत शिकविण्याचे हुशारीबद्दल परीक्षा द्यावी. आणि अशा परिक्षेत जे उतरतील त्यांस जागा मिळाव्या. ज्या मास्तराचे हाताखालीं असले उमेदवार रहातील त्यांणीं आस्थापूर्वक त्यांस शिकवावें ह्मणून दरएक पास झालेल्या उमेदवाराबद्दल १० रुपये त्यास बक्षीस द्यावें, ह्मणजे कामास उत्तेजन येईल. असा क्रम चालू केल्यास ज्या कारणांकरितां नार्मलस्कूल आहे तीं कारणें सफल होतील, आणि सरकारास खर्चही कमी लागेल. हल्लीं असलेल्या नार्मलस्कुलाचा १० पगारी विद्यार्थी तयार करण्याचा वार्षिक खर्च (विद्यार्थ्यांच्या पगारासुद्धां) ७६६० रुपये आहे. ह्मणजे दोन वर्षांचा एकंदर खर्च १४.१२० रुपये होतो. आणि आह्मी वर सांगितलेल्या रितीनें १० पगारी विद्यार्थ्यांस मास्तर तयार करण्यास दोन वर्षांत ९७०० रुपये खर्च लागतो. तर नवीन डायरेक्टर या योजनेकडे लक्ष देतील अशी आमची आशा आहे. असें केल्यानें ट्रेनिंग कालेज मोडलें जाईल खरें. पण तें असल्यापासून जे फायदे होत नाहींत ते शाळांखात्यास होतील अशी आमची खात्री आहे. मूळचे हेतु सिद्धीस नेण्यास आहे हेंच कालेज सुधारण्याचें मनांत आणलें तर खर्च मात्र अधिक वाढेल.

अस्तु. ही हकीकत नार्मलस्कुलाचे मराठी भागाचे संबंधानें आहे. हिंदुस्थानी साइडला हा विच्यार तूर्त लागू नाहीं.

## वऱ्हाड.

हैदराबादचे आमचे धनी अल्पवयस्क निजाम साहेब गेले मंगळवारीं घोड्याचे गाडींत बसून हवा खाण्यास जात असतां मोठ्या रहदारीच्या रस्त्यांत घोडे बुजल्यानें त्यांची गाडी अडली व दोन्ही घोडे उधळले पण ईश्वर कृपेनें सरकारच्या शरिरास कांहीं अपाय झाला नाहीं. त्यांचे शिक्षक मि० क्लर्क साहेब त्या बरोबर गाडींत होते त्यांनां जलदीनें व युक्तीनें उडी टाकून निजाम साहेबास गाडींतून उचलून काढून खालीं घेतलें.

---

मुनसफीच्या तीन चार जागा नवीन करण्याविषयीं वाटाघाट चालली होती, पण त्या करूं नयेत असें ठरल्याचें ऐकतों.

---

प्रिन्स आफ वेल्सबरोबर सदरलंडचे ड्यूक आले आहेत ते मद्रासेहून हैदराबाद पहाण्याकरितां गेले होते व वाटेंत कलबुर्गा एथील उरूसही त्यांनीं पाहिला. निजाम सरकारांनीं त्यांचें आदरातिथ्य उत्तम प्रकारें करवून त्यांस दिवाण साहेबांचे येथें मोठी मेजवानी दिली. दिवाण साहेब तेथें नव्हते तरी त्यांचे पुतण्यांनीं बेत उत्तम ठेविला होता. ड्यूक साहेब एक दोन दिवस राहून मुंबईस गेले व तेथून कलकत्त्याकडे गेले.

---

रेसिडेंट साहेब सर रिचर्ड मीड आपले पत्नीसहवर्तमान १९ दिवस बंगलोरकडे गेले आहेत.

---

हैदराबादचीं कोर्टें कलबुर्ग्याचे उरूसकरितां १४वे तारखेपासून १८वे तारखे पर्यंत बंद होतीं.

---

माजी रेसिडेंट मि० सांडर्स साहेब यां विषयीं असें वर्तमान प्रसिध्ध झालें आहे कीं त्यांचा कांहीं दोष नसतां खरे कारणाकरितां त्यांनीं रजा मागितली व ती हिंदुस्थान सरकारानें न देतां त्यांस पाहिजे तर राजिनामा द्यावा असें सांगितलें व त्याबरोबर त्यांनीं राजिनामा पाठविला व ते निघून गेले पण पुढें हिंदुस्थान सरकारानें त्यांचा राजिनामा मंजूर केला नाहीं असें ह्मणतात. खरेंच सांडर्स साहेबाचा कांहीं अपराध नसतां व त्यांचे कुटुंबास असमाधान असतां अशा प्रसंगीं हिंदुस्थान सरकारानें टेंचून लिहून त्यांचे मनास दुःख दिलें हें चांगलें केलें नाहीं असें कोणासही वाटेल. व हिंदुस्थान सरकारासही तसें वाटलें असावें असें दिसतें. ह्मणूनच त्यांचा राजिनामा त्यांच्यानें पास करवला नाहीं.

---

कमिशनर व जुडिशियल कमिशनर यांच्या स्वाऱ्या चिखलदऱ्यास खिस्तमस करितां राहिल्या आहेत असें ऐकतों. आमचे येथील डिपुटी कमिशनर मेजर बेल साहेब व असिस्टंट मंडळी अकोले तालुक्यांत वाशिंबे येथें जमली आहे. सर्व आफिसांना २४वे तारखेपासून पहिले तारखेपर्यंत सुट्या आहेत.

---

रा. रा. माधवराव हरी सहस्त्रबुध्ये यांस रेसिडेंट साहेबाच्या हुकुमाची समज दिली; त्याप्रमाणें त्यांनीं राजिनामा द्यावयाचा परंतु ते एक मागणें मागत आहेत कीं आपणास सहा महिन्याची बिन पगारी रजा द्यावी ह्मणजे तितक्यांत कोठें नोकरी मिळाल्यास आजपर्यंत सुमारे दहा वर्षें झालेली नोकरी पेनशनाचे मुदतींतून व्यर्थ जाणार नाहीं. हें त्यांचें मागणें सयुक्तिक आहे व तें त्यांनां मिळावें असें आह्मी इच्छितो.

---

अकोला हायस्कुला पैकीं ६ विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन पास झाले व उमरावतीपैकीं २ झाले.

---

रा. रा. काशिनाथ बाळकृष्ण मराठे मुरबाडचे सब. जडज नाताळचे सुटींत येथें आले आहेत.

---

एथील कित्येक मंडळीं नाताळचे सुटींत इंदुर, नागपुर वगैरे ठिकाणें पहाण्यास गेली आहे.

## वर्तमानसार

असें वर्तमान समजलें आहे कीं केरोलीचा राजा मरण पावला.

मेसर्स मुरारजी गोकुळदास, रघुनाथ नारायण खोटे, आणि शांताराम नारायण वकील हे प्रिन्सच्या समारंभाकरितां मुंबईहून कलकत्यास गेले आहेत.

मि० थामस बर्नेनी यांस मुंबईचे एद्या सालचे शेरीफ नेमिलें.

मुंबईचे [illegible] [illegible]जी, व [illegible] राजपुत्र जसवंतसिंगजी हे मुंबईच्या म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेंत पास झाले.

मुंबई सरकारचे पोलिटिकल सेक्रेटरी मि० गान साहेब विलायतेस रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

मि० एथरीज साहेब मुंबई इलाख्यांतील दक्षिण दुमालवाचे सेटलमेंट आफिसर यांस क्या० फिलंगटचे जागेवर रेजिस्टर खात्याचे इन्स्पेक्टर जनरल नेमणार असें समजतें.

बी. ए. ची परीक्षा— ह्या परिक्षेंत साल मजकुरी एकंदर १८ उमेदवार पास झाले. यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

१ ला वर्ग— १ दलाल त्रिभुवनदास लक्ष्मीदास आणि. २ दामले कृष्णाजी हरि.

२ रा वर्ग—१ आत्रे अनाजी रामचंद्र, २ भट दामोदर दिनानाथ, ३ छत्रे निळकंठ विनायक, ४ चिपळूणकर लक्ष्मण कृष्ण, ५ दलाल आदरजी मंचरजी, ६ देसायी खडुभाय हंद्राजी, ७ गांधी जिबाजी दिनशाजी, ८ हागन ड्यानियल फ्रेड्रीक, ९ कोपरकर गोविंद बाळकृष्ण, १० मराठे कृष्णा सदाशिव, ११ ओबळेकर मेरेश्वर नारायण, १२ रोम्यानिनी रिनोल्डो, १३ सोहनी गणेश कृष्ण, १४ त्रिपयी गोवर्धन माधवराम, १५ उपासनी श्रीधर बाळकृष्ण, १६ बाळवे शिवराम सिताराम.

यांपैकीं पांच डेक्कन कालेज, १० एल्फिन्स्टन कालेज व ३ सेंट झेवियर कालेजांतून पास झाले. चिपळूणकर लक्ष्मण कृष्ण तूर्त डेक्कन कालेजाचे व परिक्षेपूर्वी डाक्टर उइलसनच्या कालेजांत अभ्यास केलेले होते. यांस अधिक गुण मिळाल्यामुळें त्यांस एलीस स्कालरशिप मिळाली. ज्ञा. प्र.

यंदाच्या एल एल बीच्या परिक्षेंत उमेदवार पास झाले त्यांचीं नांवें—१ यशवंत वासुदेव आठल्ये एम ए. २ गोपाळ विनायक भानप बी ए. ३ रामचंद्र विष्णु गोखले बी ए. ४ कृष्णाजी नारायण खरे बी ए. ५ विनायक महादेव पंडित बी ए. सदर्हू पैकीं यशवंत वासुदेव आठल्ये एम ए यांस आरनाल्ड स्कालर्शिप मिळाली.

**तारीख १२ डिसेंबरच्या वऱ्हाडसमाचारांत कंपाझिटरच्या नजरचुकीनें एम एच्या परिक्षेंत पास झाल्याचींच नांवें एल एल बींत पास झालीं ह्मणून लिहिलें गेलें ती चूक आहे. खरीं नांवें वर लिहिल्याप्रमाणें आहेत. ए. व. स.

मुंबईंतील धर्मादाय प्रकरणाकरितां देण्यासाठीं गायकवाड सरकारानें २५०० रु० पाठविले आहेत.

युनिव्हर्सिटीकडील एंजिनिदरिंगच्या परीक्षा—सिव्हिल एंजिनियरिंगच्या पहिल्या परिक्षेंत २१ व एल. सी. ईच्या परिक्षेंत नऊ उमेदवार पास झाले.

मुंबईच्या म्युनिसिपालिटीस पोलिसच्या खर्चाकरितां सरकारांतून सुमारें एक लक्षाची नेमणूक सालदरसाल मिळण्याचा ठराव झाला असें बा. ग्या. कर्ते ह्मणतात.

दगाबाजी व खोटा कागद—दोघा पारशांनीं मेसर्स गाडम आणि कंपनी यांच्या हपिसांतील चेक बुकांतून पानें फाडून त्यांत रकमा भरून त्यावर खोट्या सह्या करून न्याशनल ब्यांक आफ इंडियाकडून २५,००० रु० व हांगकांग व शांघाई ब्यांककडून २१,००० रु० एकूण ४६ हजार रु० गेल्या मंगळवारीं घेतले. पुढें याजबद्दल संशय येऊन तपास होऊन त्या दोघांस कैद केलें. पैसाही बहूतेक सांपडला. चौकशी चालू आहे.

मिसस मेरी कार्पेंटर ही बाई हल्लीं कलकत्यास गेली आहे.

हिंदुस्थान सरकारास विलायतेंत व येथें मिळून ता. ३१ मार्च सन १८७४ अखेर एकंदर १२,२१,८४,०२,४१० रुपये कर्ज आहे.

रशियाच्या बादशहानीं जनरल वान काफमन यांस एक सोनेरी तलवार दिली आहे. तिजवर "खोकंदच्या लोकांच्या पराभवाकरितां" अशीं अक्षरें काढलेलीं आहेत. इं. प्र.

आह्मांस नागपुराहून एक मित्र असें लिहितो कीं यंदाचे सालीं येथें वकिलीची परीक्षा झाली. उमेदवार ९ होते. परंतु गुदस्तप्रमाणें एकही पास झाला नाहीं. दोन वर्षांत एकही उमेदवार पास न होण्यांचें कारण नागपुर सरकारास वकिलांची जरूर नाहीं हे असेल.

पुणें येथील वेदशास्त्रोत्तेजक सभेचा पहिला समारंभ तारीख पांच मिनहूस झाला. सभा रा० रा० फडतरे यांच्या वाड्यांत भरली होती. अध्यक्ष स्थानीं श्रीमंत पंत प्रतिनिधि यांस बसविलें होतें. शिवाय दुसरे सरदार व सभ्य गृहस्थ शास्त्री व वैदिक यांचा बराच थाट जमला होता.

एका रशियन वर्तमानपत्रावरून कळतें कीं रशिआंत चालू सालीं वैद्यकीचे परिक्षेस एकंदर १२५ स्त्रिया आल्या होत्या त्यापैकीं ९३ उतरल्या. अमेरिकेंतही हल्लीं वैद्यकीचा स्त्रिया फार अभ्यास करतात. स्त्रिया वैद्य असल्यापासून रोग्याची फार चांगली तजवीज ठेवली जाते असें कित्येक ह्मणतात व ही गोष्ट अंशत: खरीही असेल परंतु यापासून भयंकर परिणाम होण्याचाही संभव आहे हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. ने.ओ.

दिवसें दिवस हिंदुस्थानांत ब्रह्मसमाजाची वृद्धी होत आहे असें इंडियन मिरर ह्मणतो.

काश्मीरच्या महाराजांनीं काशीस पुढील प्रमाणें समारंभ व दानधर्म केला:—

पंचक्रोशीची यात्रा पांच दिवसांत करण्याची रीत आहे. पण महाराजांनीं शास्त्राधारानें २ दिवसांत केली. मनकर्णीकेच्या घाटावर एक हत्ती, ४ घोडे व दुसरे कित्येक सोन्या रूप्याचे व जवाहिराचे दागिने पिंडदानाच्या वेळीं दक्षणा ह्मणून दिले, या सर्वांची किंमत सुमारें ८००० आहे. विश्वेश्वरनाथाच्या देवळास ५००० रुपये दिले. व दुसऱ्या सर्व देवळांस ५० पासून २०० रुपयेपर्यंत दिले. भैरवनाथास ७ मोहोरा दिल्या. गयेस जाण्यापूर्वी सुमारें २५००० ब्राम्हणांस भोजन देण्याचा महाराजांचा विचार असून त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें एक मोहोरेहून जास्त दक्षणा देणार. गयेस एक हत्ती, ७ घोडे व लाख रुपये रोख इतकी दक्षणा देणार. अ. द.

---

## पेरकवर स्वारी.

सयाम व ब्रह्मदेश यांच्यां दक्षिणेस मलया नांवाचा द्वीपकल्प आहे. हा प्रदेश थोडासा डोंगराळ असून त्यांत मुसलमान लोकांची वस्ती व राज्य आहे. या द्वीपकल्पाचे किनाऱ्यावर इंग्रजलोकांनीं वसाहत केली आहे. या प्रदेशांत लारूट नांवाची एक नदी असून तिचे शेजारच्या डोंगरांत कथलाच्या पुष्कळ खाणी आहेत. या खाणींतून कथील काढण्याकरितां पुष्कळ चिनीलोक त्या प्रदेशांत येऊन राहिले आहेत. सुमारें दोन तीन वर्षांपूर्वी सदरील खाणींत काम करणाऱ्या चिनीलोकांत तंटा उपस्थित झाला होता. हा तंटा उपस्थित झाला त्याच सुमारास पेरक संस्थानचे सुलतान मरण पावले. मरण पावलेल्या सुलतानाचे गादीस इसमायल व अबदुल्ला हे दोघेजण आपला हक्क दाखवूं लागले. या उभय कज्जापैकीं खाणीच्या संबधानें उपस्थित झालेला चिनीलोकांचा तंटा मिटला. सुलतानाचे गादीबद्दल तंटा मिटला नाहीं. उभयतां वारसदारांपैकीं अबदुल्ला यास इंग्रजलोकांच्या वसाहतीचे गवर्नर सर आंडरू क्लार्क. ( हल्लीं हिंदुस्थान सरकारचे पब्लिक वर्क्स खात्या संबधी मेंबर; )यांनीं आश्रय देऊन त्यास गादीवर बसविलें. अबदुल्ला हा चंडोल ओढणारा व वाईट चालीचा असा असून इंग्रजलोकांनीं त्यास आश्रय दिला याचें कोणास नवल वाटणार नाहीं! अबदुल्लास गादीवर बसवून वसाहतीच्या गवर्नरानें पेरक संस्थानचे दरबारांत इंग्रजसरकार तर्फे मि० बर्च यांस रेसिडेंट नेमलें. अबदुल्ला यास संस्थान प्राप्त झाल्यापासून तो कांहीं दिवस चांगल्या रीतीनें वागला परंतु पुढें पूर्ववतप्रमाणें चंडोल ओढूं लागला व लोकांवर जुलूम करूं लागला. अबदुल्लास गादीवर बसविण्यापूर्वी त्याचा व सर. आंडरू क्लार्क यांचा जो तह झाला होता त्यांत अबदुल्लानें इंग्रजसरकारच्या रेसिडेंटाचे अनुमतें वागावें असें ठरलें होतें; परंतु पुढें आपण केलेल्या कराराप्रमाणें तो वागेनासा झाला. जमाबंदी वगैरेचे कामांत आपलें ऐकत नाहीं असें रेसिडेंटास वाटल्यावरून रेसिडेंट यांनीं गवर्नरास रिपोर्ट केला, त्यांत ते लिहितात कीं अबदुल्ला हा चंडोल ओढणारा असून फारच मूर्ख आहे व राज्यास अगदी निरुपयोगी आहे. आंडरू क्लार्क यांची हिंदुस्थानांत बदली झाल्यानंतर सर विलियम जरव्हाइस यांस या द्वीपकल्पांतील वसाहतीचे गवरनर नेमिलें. सर विलियम हे आल्यानंतर पेरकचे रेसिडेंट मि० बर्च यांनीं पुन: अबदुल्लाचें वर्तन व पेरक संस्थानची स्थिति याबद्दल गवरनरास साग्र हकीकत लिहिली. हा रिपोर्ट पोंचल्यावर सर विलियम हे पेरक संस्थानची व्यवस्था कशी काय आहे ती स्वत: पहावी ह्मणून तिकडेस गेले होते. सुलतान अबदुल्ला व सर विलियम जरव्हाइस यांची मुलाकात झाल्यावर पेरक संस्थानच्या अव्यवस्थेबद्दल कांहीं बोलणें झालें त्यांत सुलतानास सर विलियम यांणीं दर्शविलें कीं, झालेल्या कराराप्रमाणें सुलतानानें वर्तन केलें नाहीं व चालू रीतिप्रमाणें राज्य कारभार चालल्यास देशांत सुवत्ता रहावयाची नाहीं. सर विलियम यांणीं सुलतानास आणखी असें सांगितलें कीं, पेरक हें पिनांग यास जवळ असल्या कारणानें पेरकची व्यवस्था राखणें इंग्रज सरकारास अवश्य आहे. इंग्रज सरकारचे मदतीखेरीज संस्थानची योग्य व्यवस्था रहावयाची नाहीं असें इसमायल ( सुलताचा प्रतिस्पर्धी ) व संस्थानचे दुसरे माकरीही कबूल करितात. याकरितां स्थानचा कारभार इंग्रज अधिकाऱ्यांचे स्वाधीन करावा व तुह्मास व तुमचे मानकऱ्या संस्थानांतून पेनशनें मिळतील असें गवनरानें सुलतान अबदुल्लास सुचविलें. सर विलियम आणखी असें ह्मणतात कं संस्थानची अशी तजवीज केली असतां कारभार चांगला चालेल व अबदुल्ला इस्मायल यांच्या द्वेषाची अखेरा ल्यासारखें होईल. संस्थानची चांगली व्यवस्था व कारभार तेथील लोकांच्या इच्छेनुरूप चालविणें जरूर व सुलतानास अबदुल्लानें केलेली सूचना मान्य केल्यास त्या नावानें संस्थानचा कारभार चालवावा असा माझा निश्चय झाला आहे असें र. विलियम लिहितात. गवनेर व सुलतान यांची भेट झाल्यानंतर पुढें रेसिडेंट नीं संस्थानच्या रयतेवर एका प्रकारचा कर बसवावा असें सुलतानास सुचविलें. सुलतनानें रेसिडेंटाची सूचना मान्य केलासारखें दर्शविलें परंतु सूचना मान्य केलाच दस्तैवज दिला नाहीं. सर. विलियम हे इक संस्थानाहून सिंगापुर ( चीन ) येथें परत आल्यावर कौन्सिल भरवून त्या मुलाकतीचे वेळीं झालेल्या सर्व गोष्टी सांगितल्या. संस्थानचे रयतेवर सुलतान अबदुल्ला जुलूम करतो, संस्थानची व्यवस्था नीट ठेवित नाहीं, संस्थानचे मानकरी व पदच्युत केलेला सुलतान इस्मायल संस्थानचें काम आपणाकडेस घेऊन आपले अधिकारी नेमून चालविण्यास कबूल आहेत असें सर. विलियम यांनीं आपल्या कौन्सिलास सांगितलें. नंतर इंडिआ स्टेट सेक्रेटरी यांच्या हुकुमावांचून तेथील कारभार ताब्यांत घेऊन सर. विलियम यांनीं संस्थानचा कारभार रेसिडेंट मि० बर्च यांच्या मार्फत चालविला. संस्थानांतील मानकऱ्यांचा व रेसिडेंट यांचा ताव न राहिल्यामुळें रेसिडेंट हे मारलेले: याच कारणाकरितां पेरक येथील लोकांवर हल्लीं स्वारी झाली आहे.

या सर्व कृत्यांची जबाबदारी सर. विलियम यांजवर आहे. पेरक संस्थानचा इंग्रज सरकारच्या वसाहतींतील अधिकाऱ्यांशीं संस्थानांत हात घालण्यासारखा संबध असाव असें दिसत नाहीं. संस्थानच्या गादीवरील हक्कविषयीं जो कलह उत्पन्न झाला त्यात अबदुल्ला हा अफीमबाज आहे असें मा[illegible] सतां त्यास आश्रय दिल्यामुळें संस्[illegible]ही दशा झाली हें उघड आहे. ए[illegible]वडांत इंग्रज लोकांनीं जेथें जेथें [illegible]पादन [illegible] तेथें असाच प्रकार इ[illegible] हिंदुस्थानांतही असेच प्रकार घडले [illegible] पेरक संस्थानचे काय होईल हें [illegible]च आहे. सर. विलियम यांणीं आप[illegible] मुखत्यारीनें [illegible] सर्व गोष्ट केली आहे याचा प[illegible]त्र पहागें राहिलें आहे.

---

हें पत्र [illegible]

फडके यां[illegible]